रायगड, नवी मुंबई
◆ वर्ष १७ ◆ अंक २११
www.ramprahar.com
# राम प्रहर
रविवार, १६ फेब्रुवारी २०२५ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹२

## कर्नाळा अभयारण्यात मधमाशांचा हल्ला; एकाचा मृत्यू, पाच जण जखमी



**पनवेल, खारघर** : पनवेल तालुक्यातील कर्नाळा पक्षी अभयारण्यात पर्यटनासाठी आलेल्या पर्यटकांवर मधमाशांनी हल्ला केल्याची घटना शनिवारी (दि. १५) सकाळी साडेअकराच्या सुमारास घडली. यात एकाचा मृत्यू, तर पाचजण जखमी झाले आहेत. सुट्टी असल्याने मोठ्या संख्येने पर्यटक कर्नाळा अभयारण्य व किल्ल्यावर आले होते. यामध्ये मुंबईतील व्हीजेटीआय महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचा समूह होता. याशिवाय काही जण आपल्या कुटुंबासह पर्यटनासाठी आले होते. अचानकपणे झालेल्या मधमाशांच्या हल्ल्यामुळे पर्यटकांची धावपळ उडाली. यामध्ये संदीप गोपाळ पुरोहित (वय ४४, रा. कोपरखैरणे) यांच्या डोक्याला मार लागल्याने त्यांचा मृत्यू झाला, तर इतर पाचजण जखमी असून त्यांची प्रकृती स्थिर असल्याची माहिती पोलिसांनी दिली.

अंतरंग

अल्पवयीन मुलीला अपत्य; आरोपीवर गुन्हा दाखल/२
महावाचन उत्सवात गार्गी महाडिक रायगडात प्रथम/६
जामनेरमध्ये आज रंगणार कुस्तीचा महाकुंभ/८






# कोंबड्यांमुळेही जीबीएसची लागण

## उपमुख्यमंत्री अजित पवार यांची माहिती

**पुणे : प्रतिनिधी**

पुण्यानंतर राज्यभरात हातपाय पसरवणाऱ्या जीबीएस आजाराबाबत आता मोठी माहिती समोर येत आहे. जीबीएस आजार हा पाण्यामुळे होत असल्याचा दावा याआधी केला जात होता, पण या आजाराचे संक्रमण होण्यामागील आणखी एक कारण आता समोर येत आहे. फक्त दुषित पाण्यामुळेच नाही तर कोंबड्यांमुळे या आजाराची लागण होत असल्याची माहिती उमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिली आहे. गुलियन बॅरी सिंड्रोम अर्थात जीबीएस आजारामुळे राज्यातील रुग्णांच्या मृत्यांच्या संख्येतही वाढ होऊ लागली आहे. त्यामुळे प्रशासनाची डोकेदुखी वाढली आहे.



जीबीएस आजाराचा वाढता विळखा पाहता आरोग्य विभाग आणि प्रशासनाकडून युद्ध पातळीवर उपाययोजना केल्या जात आहेत, पण रुग्णांची संख्या वाढतानाच दिसत आहे. या दरम्यान अजित पवार यांनी या आजाराबाबत महत्त्वाची माहिती दिली आहे. कच्चे मांस खाल्ल्यामुळे जीबीएसची लागण होत आहे, असेही अजित पवार यांनी स्पष्ट केले.

मधल्या काळात एक आजार उद्भवला. आपल्याला वाटले की पाण्यामुळे या आजाराची लागण रुग्णांना झाले. पण खडकवासला परिसरातील काहींचे म्हणणे आहे की, कोंबड्यांमुळे या आजाराची लागण झाली. त्याबाबत अतिशय चांगल्या प्रकारची सगळी माहिती घेतलेली आहे. मी आता राजेंद्र भोसले यांना प्रेसनोट काढायला सांगणार आहे. तिथल्या कोंबड्यांची व्हिल्हेवाट लावायची गरज नाही. फक्त कोंबड्या घेतल्यानंतर ते अन्न पूर्णपणे शिजवून घेतले पाहिजे, अशी महत्त्वाची प्रतिक्रिया अजित पवार यांनी शनिवारी दिली.

### राज्यात दिवसभरात तिघांचा मृत्यू

***जीबीएस आजार दिवसेंदिवस राज्यातील रुग्णांचा बळी घेताना दिसतोय. राज्यात दिवसभरात तीन रुग्णांचा जीबीएस आजाराने मृत्यू झाला आहे. सांगलीतील मिरज शासकीय रुग्णालयात दोघांचा मृत्यू झाला आहे. यामध्ये एका सहा वर्षाचा मुलाचा आणि ६० वर्षाच्या महिलेचा समावेश आहे. नागपूरच्या शासकीय रुग्णालयात ४५ वर्षीय रुग्णाचा मृत्यू झालाय तसेच दोघांवर सध्या आयसीयूत उपचार सुरू असल्याची माहिती आहे. मिरजच्या शासकीय रुग्णालयात सध्या सात जीबीएसबाधित रुग्णांवर उपचार सुरू आहेत.***

# न्यू इंडिया बँकेवर निर्बंध; नेरूळ शाखेत ग्राहकांची गर्दी



**नवी मुंबई : बातमीदार**

बँकिंग क्षेत्र नियामक असलेल्या भारतीय रिझर्व्ह बँकेने मुंबईस्थित न्यू इंडिया कोऑपरेटिव्ह सहकारी बँकेवर बंदी घातली आहे. त्यामुळे या बँकेतून कोणताही ग्राहक आपल्या कष्टाचे पैसे काढू शकणार नाही. पुढील सहा महिन्यांसाठी ही बंदी लागू असणार असल्याची माहिती पुढे आली आहे, मात्र ग्राहकांना पाच लाखांपर्यंत त्यांचे पैसे परत मिळणार असून त्यांना काही महिने वाट पाहावी लागणार आहे असे फलक न्यू इंडिया बँकेच्या सर्व शाखांसमोर पाहायला मिळाले. मुंबईसह ठाणे, नवी मुंबईत तब्बल २६ शाखा या बँकेच्या आहेत.

नवी मुंबईत नेरूळ पश्चिम सेक्टर २० येथे रेल्वे स्थानका समोर बँकेची शाखा आहे. शुक्रवारी सकाळपासून ग्राहकांना व्यवहार करताना अडथळे येत होते. अनेक ग्राहकांनी त्यासाठी बँकेत धाव घेतली असता, बँकेने रिझर्व बँकेने व्यवहार थांबवले असल्याची माहिती ग्राहकांना दिली. ही बातमी शहरात वाऱ्यासारखी पसरल्याने ग्राहकांनी शाखेत गर्दी केली होती. बँकेने ज्यांचे लॉकर आहेत अशांचे लॉकर हाताळण्यास परवानगी दिल्याने, ग्राहकांनी आपल्या सोन्या चांदीच्या वास्तू तातडीने ताब्यात घेतल्या, मात्र पैशांसाठी ग्राहकांना काही महिने वाट पाहावी लागणार आहे. पैसे अडकले असले तरी सोन्याच्या मौल्यवान वस्तू हाती मिळाल्याने अनेकांनी सुटकेचा निःश्वास सोडला.

बँकेची आर्थिक स्थिती लक्षात घेऊन हा निर्णय घेण्यात आल्याचे आरबीआयने सांगितले. आरबीआयच्या या कारवाईमुळे आता ना बँकेला कोणता व्यवहार करता येणार, ना ग्राहकांना पैसे जमाण किंवा काढता येणार आहेत. त्यामुळे बँकेवर झालेल्या या कारवाईमुळे खातेदारांमध्ये गोंधळाचे वातावरण आहे.

दरम्यान, आरबीआयन न्यू इंडिया कोऑपरेटिव्ह बँकेच्या केवळ व्यवहारांवर बंदी घातली आहे. बँकेचा परवाना अद्याप रद्द केला नाही. आरबीआयने म्हटले अलिकडच्या काळात बँकेने केलेल्या काही अनियमिततेमुळे ग्राहकांच्या सुरक्षिचा विचार करून हा निर्णय घेण्यात आला. आम्ही या प्रकरणाची चौकशी करत असून बँकेच्या परिस्थितीवर लक्ष ठेवणार आहे. आवश्यकतेनुसार पुढील कार्यवाही केली जाईल.

### आरबीआयने बँकेवर कारवाई का केली?

***न्यू इंडिया को-ऑपरेटिव्ह बँक गेल्या दोन आर्थिक वर्षांपासून तोट्यात आहे. बँकेच्या वार्षिक अहवालानुसार मार्च २०२४ मध्ये संपलेल्या आर्थिक वर्षात बँकेला २२७.८ दशलक्ष रुपये आणि २०२३ मध्ये ३०७.५ दशलक्ष रुपये तोटा झाला. बँकेचे आगाऊ कर्ज ३१ मार्च २०२४ पर्यंत ११.७५ अब्ज रुपयांवर घसरले, जे एका वर्षापूर्वी १३.३० अब्ज रुपये होते. त्याचवेळी, या कालावधीत बँकेतील एकूण ठेवी २४.०६ अब्ज रुपयांवरून २४.३६ अब्ज रुपयांपर्यंत वाढल्या आहेत.***

# रामशेठ ठाकूर महाविद्यालयात मीडिया आणि मनोरंजन उद्योगावर सत्र

**खारघर : प्रतिनिधी**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे खारघर येथे रामशेठ ठाकूर वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात स्किल डेव्हलपमेंट समितीतर्फे बुधवारी (दि.१२) मीडिया व मनोरंजन उद्योगावर सत्राचे आयोजन केले होते.



या सत्रासाठी मॅकचे संदीप सिंग यांनी उपस्थित राहून महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना मीडिया आणि मनोरंजन उद्योग हे मनोरंजन, माहिती आणि सांस्कृतिक अनुभव प्रदान करण्यासाठी विविध चॅनेल्सचा वापर करणारे क्षेत्र आहे. हा उद्योग रेडिओ, टीव्ही, सिनेमा, प्रिंट मीडियाचा समावेश करतो, तसेच डिजीटल मीडिया आणि सोशल मीडिया प्लेटफॉर्म्समध्येही मोठा विस्तार झाला आहे तसेच विद्यार्थ्यांना या क्षेत्रांमध्ये नोकरीच्या संधी मिळतील याविषयी मोलाचे मार्गदर्शक केले.

महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या डॉ.महेश्वरी झिरपे यांनी हा उपक्रम यशस्वीरित्या राबवल्याबद्दल स्किल डेव्हलपमेंट समितीचे अभिनंदन केले व पुढील उपक्रमांसाठी शुभेच्छा दिल्या.

या सत्राचे आयोजन प्रा. रूपाली नागरेकर यांनी केले तसेच स्किल डेव्हलपमेंट समितीतील इतर सर्व सदस्य व शिक्षकेतर कर्मचारी विद्यार्थी यांनी उपस्थित राहून सहकार्य केले.

# पेणच्या वाशी येथील जगदंबा वाडीत चोरी

**पेण : प्रतिनिधी**

पेण तालुक्यातील वाशी गावातील जगदंबा वाडीत चोरट्याने बंद घरातून एक लाख ३४ हजार रुपयांची चोरी केल्याची घटना घडली आहे.



याबाबत माहिती अशी कि, वडखळ पोलीस ठाणे हद्दीतील वाशी गावातील जगदंबा वाडी येथील फिर्यादी भाई चंद्रकांत म्हात्रे व त्यांचे कुटुंबीय हे ८ ते ९ फेब्रुवारी सायंकाळी ७:३० वाजेपर्यंत घरात नसताना रात्रौच्या सुमारसा अज्ञात चोरट्याने घरच्या समोरील बंद दरवाज्याची कडी कोयंडा कशाच्या तरी साहाय्याने उचकटुन दरवाजा उघडुन घरात प्रवेशकेला. या वेळी त्याने घरातील बंद कपाटाचे लॉक तोडुन एकूण एक लाख ३४ हजार रुपयाचे दागिने चोरून नेले.

याबाबत वडखळ पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास सहायक पोलीस निरीक्षक विजय जाधव हे करीत आहेत.

# सिडकोची पुढे ढकलेली सोडत आता बुधवारी

**नवी मुंबई : सिडको वृत्तसेवा**

छत्रपती शिवाजी महाराज जयंती दिनाचे औचित्य साधून सिडको महामंडळाच्या माझे पसंतीचे सिडकोचे घर गृहनिर्माण योजनेची संगणकीय सोडत बुधवारी (दि.१९) दुपारी २ ते ४ च्या दरम्यान होणार आहे. प्रत्यक्ष कार्यक्रमस्थळासोबतच सोडतीचे थेट प्रक्षेपण वेबकास्टींगच्या माध्यमातून करण्यात येणार आहे. यामुळे अर्जदार आपल्या सोयीच्या ठिकाणाहून या सोडतीचे साक्षीदार होऊ शकतात.

सोडत प्रक्रियेचे थेट प्रक्षेपण https://cidcohomes.com या संकेतस्थळावर करण्यात येणार आहे. अर्जदार सदर संकेतस्थळावर, त्यांच्या सिडको होम खात्यात लॉग इन करून सोडतीचा निकाल घरबसल्या देखील पाहू शकतात. याशिवाय सोडतीचे थेट प्रक्षेपण खारघर पूर्व (तळोजा): भूखंड क्र.१४, सेक्टर-३७, तळोजा पंचानंद, पनवेल, रायगड, ४१०२०८, खांदेश्वर: भूखंड क्र. १, सेक्टर-२८, खांदेश्वर रेल्वे स्टेशन, कामोठे, पनवेल, रायगड, ४१०२०९, खारघर: भूखंड क्र. ६३ अ, सेक्टर-१५, खारघर, पनवेल, रायगड, ४१०२१० येथील अनुभव केंद्रांवर देखील करण्यात येणार आहे. यामुळे २६,००० कुटुंबांचे हक्काच्या घराचे स्वप्न साकार होण्याच्या क्षणाचे साक्षीदार होण्याची संधी नागरिकांना सुलभरीत्या उपलब्ध होणार आहे.

# सेक्सटॉर्शनला वैतागून शिक्षकाची आत्महत्त्या

**उरण : प्रतिनिधी**



अलिबागमधील कुर्डुस नावाच्या गावात राहणाऱ्या वैभव पिंगळे (वय ४५) या वर्षांच्या प्राथमिक शाळेच्या शिक्षकाने न्हावा - शिवडी अटल सेतूवरून समुद्रात उडी मारून आत्महत्या केली. ही धक्कादायक घटना व्हॅलेंटाईन डेच्या दिवशी अर्थात शुक्रवारी (दि.१४) घडली आहे. सेक्सटॉर्शनला वैतागून वैभव पिंगळे यांनी आत्महत्या केल्याचे वृत्त आहे. या प्रकरणी पोलीस तपास सुरू आहे.

शुक्रवारी सकाळी नऊच्या सुमारास वैभव पिंगळे हे क्रेटा कारने अटल सेतूवर आले. त्यांनी कार रस्त्याच्या कडेला उभी केली. नंतर पुलावरून समुद्रात उडी मारली. सीसीटीव्ही नियंत्रण कक्षाने सेतूवर एक कार थांबली असल्याचे पोलिसांना कळवले. माहिती मिळताच पोलीस घटनास्थळी पोहचले, परंतु पोलीस पोहचण्याआधीच वैभव पिंगळे यांनी आत्महत्या केली होती.

मागील काही दिवसांपासून सायबर गुन्हेगारांनी वैभव पिंगळेंना सेक्सटॉर्शनच्या जाळ्यात अडकवले होते. पैसे उकळण्यास सुरुवात केली होती. या प्रकाराला वैतागलेले वैभव पिंगळे प्रचंड मानसिक ताणाखाली होते. त्यांनी पोलिसांची मदत घेण्याऐवजी आत्महत्येचा पर्याय निवडल्याचे प्राथमिक तपासातून निर्दर्शनास आले आहे. या प्रकरणी पोलिसांचा अधिक तपास सुरू आहे. उलवे पोलिस अधिक तपास करीत आहेत.

# अल्पवयीन मुलीला अपत्य; गुन्हा दाखल

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत तालुक्यातील आशाणे येथील एका व्यक्तीने अल्पवयीन मुलीशी शारीरिक संबंध ठेवल्याने संबंधित पिडीता गर्भवती राहीली तिला अपत्य झाल्याने पिडीतेने कर्जत पोलीस ठाण्यामध्ये तक्रार दाखल केल्याने त्या व्यक्तीवर पोस्को अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला असून त्यास कर्जत पोलिसांनी अटक केली आहे.

कर्जत तालुक्यातील आषाणे येथील एक व्यक्ती हा मार्च २०२४ ते एप्रिल २०२४ या कालावधीत आषाणे, ता.कर्जत येथे कुमारी फिर्यादी यांचे राहते घरी जावून फिर्यादी या अल्पवयीन असल्याचे माहिती असतानादेखील हा व्यक्ती अल्पवयीन हिचे सोबत तीन ते चार वेळा शरीर संबंध ठेवले त्यातून फिर्यादी हि गर्भवती राहून नंतर तिस आपत्य प्राप्त झाले. गुन्ह्यातील आरोपीस अटक केली आहे.

याबाबत कर्जत पोलीस ठाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोलीस अधिकारी जयवंत वारा हे करीत आहेत.

# गवंड्याचा मुलगा बनला पोलीस!

**उरण : बातमीदार**

उरण तालुक्यातील खोपटे-धसाखोशी येथील उत्कर्ष उत्तम ठाकूर याची वयाच्या २१व्या वर्षीच महाराष्ट्र पोलीस तसेच राज्य राखीव पोलीस दल या दोन्ही विभागात निवड झाली आहे.



उत्कर्ष ठाकूरचे सर्वत्र कौतुक

लहानपणीच आपल्या मनाशी खूणगाठ बांधत देशसेवेचे स्वप्न उराशी बाळगून असणारा उत्कर्ष याने अत्यंत कठीण काळात या दोन्ही विभागात मोठी कामगिरी करत आपली छाप सोडली. वडील घर बांधण्याचे काम करतात. घराची परिस्थिती बेताची असताना सुद्धा दहावी आणि नंतर बारावी परीक्षेत चांगले गुण असताना सुद्धा फक्त देश सेवा करण्याचे स्वप्न उराशी बाळगणारा उत्कर्ष याने बेलापूर येथे श्री करिअर अकॅडमीमध्ये प्रवेश घेवून आपला सराव चालू केला.

कोरोना काळात बस उपलब्ध नाही म्हणून पहाटे लवकर उठून तो टाउनशिपपर्यंत चालत जात असे, पण तो थांबला नाही. थकला नाही. आणि सरते शेवटी त्याने आपल्या मेहनतीने, जिद्दीने आणि संयम बाळगत महाराष्ट्र पोलीस मुंबई विभाग तसेच राज्य राखीव पोलीस दल यामध्ये त्याची निवड झाली. त्याच्या या यशाबद्दल पंच क्रोशितून त्याचे अभिनंदन होत आहे. व्हॉट्सअॅप, फेसबुक आदी सोशल मीडियाच्या माध्यमातूनही सर्वच क्षेत्रातील मान्यवरांनी उत्कर्ष ठाकूर यांचे अभिनंदन केले आहे.

# माथेरानमधील समस्यांसंदर्भात भाजप नेते सोमय्या यांना निवेदन

**माथेरान : प्रतिनिधी**

भारतीय जनता पक्षाचे ज्येष्ठ नेते तथा माजी खासदार किरीट सोमय्या यांनी माथेरान शहरात पर्यावरण पूरक सुरूझालेल्या ई-रिक्षांच्या संख्येत वाढ करणे व येथील क्ले-पेव्हर ब्लॉकच्या रस्त्यांच्या दुरुस्तीची कामे सुरू करणे याबाबत सनियंत्रण समिती अध्यक्ष बक्षी यांना लेखी निवेदन दिले आहे.



किरीट सोमय्या दोन दिवसांच्या विश्रांतीसाठी माथेरान या आपल्या आवडीच्या पर्यटनस्थळी कुटुंबासाहित या ठिकाणी आले होते. माथेरान शहरात दाखल होत असताना सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाने सनियंत्रण समितीच्या देखरेखेखाली नव्याने सुरू झालेल्या पर्यावरण पूरक ई-रिक्षा सेवेचा लाभ या ठिकाणी त्यांनी घेतला.

प्रवासी संख्या जास्त आणि ई-रिक्षांची संख्या कमी असल्याचे त्यांच्या लक्षात आले. माथेरान पर्यटनस्थळाला मोठी पसंती मिळत असून याठिकाणी मधल्या दिवसांतसुद्धा पर्यटक संख्या वाढत असून ई-रिक्षांसाठी रांगा लागत आहेत.

यामुळे ई-रिक्षांच्या संख्येत वाढ होणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. याचबरोबर येथील क्ले-पेव्हर ब्लॉकच्या रस्त्यांची पण दुरुस्ती होणे आवश्यक आहे. अनेक ठिकणी रस्त्यांचे निखळलेले क्ले-पेव्हर ब्लॉक आणि त्यामुळे जागोजागी पडलेले खड्डे हे दृश्य किरीट सोमय्या यांनी स्वतः अनुभवले असून त्यांनी या बाबत सनियंत्रण समिती अध्यक्ष के.पी.बक्षी यांना लेखी निवेदन सादर केले आहे.

या निवेदन किरीट सोमय्या यांनी ई-रिक्षांची संख्या वाढवावी आणि येथील क्ले-पेव्हर ब्लॉकच्या रस्त्यांची दुरुस्ती करावी, अशी मागणी करण्यात आली आहे. दोन दिवसांच्या विश्रांती साठी आलेले भाजपाचे ज्येष्ठ नेते यांची या ठिकाणी माथेरान भाजप पदाधिकारी यांनी भेट घेतली.

माथेरान पर्यटक हंगाम एप्रिल, मे महिन्यात सुरू होणार असून पावसाळी पर्यटन हंगाम देखील जोरदार असतो. आता पावसाळ्यात पण माथेरान पर्यटकांना आकर्षित करीत असते. पावसाळ्यातसुद्धा पर्यटक मोठ्या प्रमाणावर दाखल होत असतात. त्यामुळे या पर्यटन हंगामापूर्वी या सर्व बाबींची पूर्तता व्हावी, असे त्यांचे मत असल्याचे येथील भाजप पदाधिकाऱ्यांनी सांगितले.

# अलिबाग येथे मच्छीमार कार्यशाळेला प्रतिसाद

**अलिबाग : प्रतिनिधी**

नॅशनल फिशवर्कर्स फोरमतर्फे (एनएफएफ) शुक्रवारी कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. त्यास उत्तम प्रतिसाद मिळाला. या कार्यशाळेत मच्छीमारांच्या विविध समस्यांवर चर्चा करण्यात आली.

छत्रपती शिवाजी महाराजांचे सागरी आरमार प्रमुख कानोजी आंग्रे यांच्या स्मारकास पुष्प अर्पण करून एनएफएफ संघटनेचा ध्वजारोहण करून सुरुवात केली. आरसीएफ थल सभागृह येथे स्वर्गीय लोकप्रिय मच्छिमार नेते भाई बंदरकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून कार्यशाळेस सुरुवात करण्यात आली.



आरसीएफ थळचे कार्यकारी संचालक नितीन हिरडे साहेब, एनएफएफ अध्यक्ष लिओ कोलासो, सरचिटणीस ओलांसो, उपाध्यक्ष रामकृष्ण तांडेल, के. आलया, ज्येष्ठ मच्छिमार नेते रामदास संधे, सचिव टी.जॉक्सन, ज्योती मेहेर, मनोहर बैले यांनी दीप प्रज्वलीत करून उदघाटन केले.

या वेळी व्यासपीटावर एस एम मरीन, व्ही.एन देशी, एम एम के एस चे सरचिटणीस किरण कोळी, सचिव उल्हास वाटकरे, मोरेश्वर वैती, उपाध्यक्ष मोरेश्वर पाटील, पालघर जिल्हा अध्यक्ष मानेंद्र आरेकर, उपाध्यक्ष विजय थाटू, रायगड जिल्हाध्यक्ष अजय सोडेकर, सरचिटणीस संतोष पाटील, कार्यध्यक्ष मंगेश कोळी आदी पदाधिकारी, मच्छिमार संस्था पदाधिकारी, मच्छीमार बंधू-भगिनी मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

# पत्रकार धम्मशील सावंत यांना पुरस्कार

**पाली : प्रतिनिधी**

रायगड प्रेस क्लबचा २०वा वर्धापन दिन व पत्रकार सन्मान सोहळा अत्यंत उत्साही व दिमाखदार पद्धतीने खोपोली येथे झाला. खालापूर प्रेस क्लब यांच्या संयोजनातून या सोहळ्याचे उत्कृष्ट आयोजन करण्यात आले होते. या वेळी टीव्ही व प्रिंट रिपोर्टर धम्मशील सावंत यांना दीपक शिंदे स्मृती व्हिडीओ जर्नालिस्ट पुरस्काराने सन्मानीत करण्यात आले.



पत्रकार धम्मशील सावंत यांनी पाली बेणसे सारख्या विविध वर्तमान पत्राच्या माध्यमातून जनतेच्या जिव्हाळ्याच्या प्रश्नांना वाचा फोडण्याचे प्रभावी काम केले आहे. या सोहळ्यात खासदार सुनिल तटकरे, मराठी पत्रकार परिषदेचे मुख्य विश्वस्त एस. एम. देशमुख, टीव्ही अँकर विशाल परदेशी, संपादिका शुभदा जोशी आदी उपस्थित होते.

**दुखवटा**

## भालचंद्र घुमकर

**मुरूड :** मुरूड तालुका राजाराम लक्ष्मण खोत भंडारी बोर्डींगचे सचिव, काळभैरव पतसंस्था मुरुडचे माजी अध्यक्ष भालचंद्र शांताराम तथा नाना घुमकर (वय ७४) यांचे बुधवारी निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी दोन विवाहित कन्या जावई, नातवंडे, भगिनी असा परिवार आहे. कै. भालचंद्र घुमकर यांचा दशक्रिया विधी नांदगाव येथे शुक्रवारी (दि.२१) सकाळी दहा वाजता होणार आहे.



रायगड, नवी मुंबई
◆ वर्ष १७ ◆ अंक २११
www.ramprahar.com
# राम प्रहर
रविवार, १६ फेब्रुवारी २०२५ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹२




पनवेल : कोशिश फाऊंडेशनच्या वतीने घेण्यात आलेल्या आमदार प्रशांत ठाकूर चषक वक्तृत्व स्पर्धेचा पारितोषिक वितरण समारंभ शनिवारी आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात झाला. या वेळी प्रमुख मान्यवर म्हणून माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर, भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, ज्येष्ठ नेते वाय.टी. देशमुख, महापालिकेचे माजी सभागृह नेते आणि कोशिश फाऊंडेशनचे अध्यक्ष परेश ठाकूर आदी उपस्थित होते. (वृत्त उद्याच्या अंकात)

# नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाचे नामकरण लोकनेते दि.बा. पाटील विमानतळ असेच होणार

■ मंत्री गणेश नाईक यांचा विश्वास; 'दिबा योद्धा सन्मान' प्रदान




**नवी मुंबई : बातमीदार, प्रतिनिधी**

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाचे नामकरण लोकनेते दि.बा. पाटील यांच्या नावेच होईल, असा विश्वास राज्याचे वनमंत्री गणेश नाईक यांनी व्यक्त केला आहे.

लोकनेते दि.बा. पाटील नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ नामकरण सर्वपक्षीय कृती समिती आणि अखिल आगरी समाज परिषद यांच्या संयुक्त विद्यमाने शनिवारी (दि. १५) वाशी येथे सभेचे आयोजन करण्यात आले होते. त्या वेळी मंत्री गणेश नाईक यांनी बोलत होते. या वेळी विमानतळ नामकरण लढ्यामध्ये सहभाग घेतलेल्या व्यक्तींचा मंत्री गणेश नाईक आणि अन्य मान्यवरांच्या हस्ते दिबा योद्धा सन्मानचिन्ह प्रदान करून गौरव करण्यात आला.

या सभेला आमदार रविशेठ पाटील, आमदार मंदाताई म्हात्रे, माजी खासदार डॉ. संजीव नाईक, माजी आमदार सुभाष भोईर, योगेश पाटील, विमानतळ नामकरण सर्वपक्षीय समितीचे अध्यक्ष दशरथ पाटील, लोकनेते दि.बा. पाटील यांचे पुत्र अतुल पाटील, समितीचे सल्लागार जे.एम. म्हात्रे, कार्याध्यक्ष जे. डी. तांडेल, भूषण पाटील, महेंद्र घरत, दीपक म्हात्रे, राजाराम पाटील, पनवेलचे माजी उपमहापौर जगदीश गायकवाड, दीपक पाटील आदी उपस्थित होते.

मंत्री गणेश नाईक यांनी आपल्या मार्गदर्शनपर संबोधनात सांगितले की, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला लोकनेते दि.बा. पाटील यांचे नाव देण्याचा शब्द दिला आहे. त्यानुसार राज्याच्या दोन्ही सभागृहामध्ये तशा प्रकारचा ठरावही मंजूर करून घेतला आहे. त्यामुळे नामकरण तर होणारच. नामकरणाच्या संघर्षामध्ये ज्या आंदोलकांवर विविध गुन्हे नोंद झाले आहेत, ते गुन्हे मागे घेण्यासंदर्भात मुख्यमंत्र्यांशी चर्चा करण्याचे आश्वासनही त्यांनी दिले.

विमानतळ क्षेत्रात निर्माण होणाऱ्या नोकऱ्यांच्या आणि अन्य कामांच्या संधी प्राधान्याने विमानतळ प्रकल्पग्रस्तांना तसेच स्थानिकांना मिळवून देण्यासाठी प्रयत्न करू. या अनुषंगाने विमानतळ व्यवस्थापनाबरोबर बैठक घेण्याची ग्वाही मंत्री नाईक यांनी दिली. प्रकल्पग्रस्तांनी गरजेपोटी बांधलेली सर्व बांधकामे मालकी हक्काने त्यांच्या नावे करण्यासाठी प्रयत्न सुरू असल्याची माहितीही त्यांनी दिली.

आमदार रविशेठ पाटील यांनी दि.बा. पाटील यांच्या कार्याचा गौरव करून त्यांनी आणलेल्या साडेबारा टक्के योजनेमुळे भूमिपुत्रांचे अस्तित्व टिकले, असे सांगितले. दि.बा. पाटील आणि दत्ता पाटील हे दोन भूमिपुत्रांचे लढाऊ नेते होते. 'दिबां'च्या नावे नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाचे नामकरण झालेच पाहिजे, असेही ते म्हणाले.


समितीचे अध्यक्ष दशरथ पाटील यांनी प्रास्ताविकात विमानतळ नामांतराची मागणी अधिक जोरकसपणे लावून धरण्याचे आवाहन केले. महाराष्ट्राच्या दोन्ही सभागृहामध्ये विमानतळ नामकरणाचा प्रस्ताव मंजूर झाला असून तो अंतिम मंजुरीसाठी केंद्र सरकारकडे गेला आहे. विमानतळ सुरू होण्यापूर्वी केंद्र सरकारने नामकरणाचा प्रस्ताव मंजूर करावा. त्याचबरोबर विमानतळ क्षेत्रात निर्माण होणाऱ्या नोकऱ्या आणि इतर कामांमध्ये स्थानिकांना प्राधान्य मिळावे, अशी मागणी करून मुंबई विमानतळाच्या धर्तीवर नवी मुंबई विमानतळासाठीदेखील पॅरेंट कमिटीची स्थापना करून त्याचे अध्यक्षपद डॉ. संजीव नाईक यांना द्यावे, अशी सूचनाही त्यांनी केली.

# देहरंग धरणाची उंची वाढविण्याच्या नियोजित प्रकल्पाला आर्थिक पाठबळ द्या

## आमदार प्रशांत ठाकूर यांची मुख्यमंत्र्यांकडे मागणी

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महानगरपालिका क्षेत्रात पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करणाऱ्या गाढी नदीवरील देहरंग धरणाची उंची वाढविण्याच्या नियोजित प्रकल्पास आर्थिक पाठबळ देण्याची मागणी आमदार प्रशांत ठाकूर यांनी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली आहे.



या संदर्भात आमदार प्रशांत ठाकूर यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, पनवेल महानगरपालिकेची स्थापना १ ऑक्टोबर २०१६ रोजी झालेली असून मुंबई, नवी मुंबई शहरालगत असल्याने तसेच विमानतळ व परिसरातील औद्योगिकरणामुळे महापालिका क्षेत्राची लोकसंख्या झपाट्याने वाढत आहे. महापालिका क्षेत्राची प्रती माणसी १५० लिटर या मापकाप्रमाणे दैनंदिन स्थुल गरज ३९४ दशलक्ष लिटर असून २०५७पर्यंत ८४७ दशलक्ष लिटर असणार आहे. सद्यस्थितीत महापालिका क्षेत्रास देहरंग धरण, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, सिडको, नवी मुंबई महापालिका (मोर्बे धरण) व एमआयडीसी यांच्याकडून सुमारे २२४ दशलक्ष लिटर पाणीपुरवठा होतो. तथापि, वाढती लोकसंख्या विचारात घेता भविष्यात त्यामध्ये फार मोठी तुट येण्याची शक्यता आहे. ही तुट भरून काढण्यासाठी दुर्दैवाने पनवेल महापालिकेकडे स्वतःच्या मालकीच्या देहरंग धरणाची उंची वाढवण्याच्या पर्यायाशिवाय अन्य पर्याय दृष्टिपथात नाही, असेही आमदार प्रशांत ठाकूर यांनी या निवेदनात अधोरेखित केले आहे.

महापालिकेच्या मालकीच्या देहरंग धरणाची पूर्ण संचय पातळी वाढविल्याने पाणी संचयात मोठी वाढ होऊन त्याच्या वापर सुलभरीत्या व कायमस्वरूपी उपाययोजना म्हणून होणार आहे. देहरंग धरणाची उंची वाढविण्यासंदर्भात व त्यासाठी करावयाच्या आर्थिक तरतुदीसंदर्भात आयुक्त-पनवेल महापालिकेने आपल्याकडे ९ जानेवारी २०२५ रोजी एक प्रस्तावही सादर केला आहे. त्या अनुषंगाने देहरंग धरणाची पूर्ण संचय पातळी २० मीटरने वाढविणे व त्यासाठी २९४ हेक्टर जमीन संपादन करण्यासाठी सुमारे ९०० कोटी रुपयांचा खर्च अपेक्षित आहे, मात्र नव्याने स्थापन झालेल्या महापालिकेची आर्थिक स्थिती विचारात घेता राज्य सरकारने त्यासाठी निधी उपलब्ध करून द्यावा, अशी मागणी आमदार प्रशांत ठाकूर यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली आहे.

## 'लाडक्या बहिणींना लवकरच मिळणार पैसे'

**जालना** : महिलांचे प्रश्न सोडवण्याचा आम्ही प्रयत्न करत आहोत. लाडकी बहीण योजनवरून आमच्यावर टीका केली जात आहे. ही योजना बंद होणार असे सांगितले जात आहे, पण येत्या आठ दिवसांत लाडक्या बहिणींना पैसे मिळणार असल्याचे राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी सांगितले. ते शनिवारी (दि. १५) जालन्यात बोलत होते. कालच मी तीन हजार ५०० कोटी रुपयांच्या चेकवर सही केली आहे. लाडकी बहीण योजनेचा फेब्रुवारीचा हप्ता आठ दिवसांत मिळणार आहे. आम्ही शब्दाचे पक्के आहोत. दिलेला शब्द पाळणारे आहोत, परंतु दिलेल्या योजनेचा फायदापण तुम्ही नीट केला पाहिजे, असे उपमुख्यमंत्री पवार म्हणाले.

## निवडक

### प्रयागराजसह अयोध्येतही भाविकांचा ओघ वाढला

**प्रयागराज** : १४४ वर्षांनी येणाऱ्या महाकुंभमेळ्याचे आयोजन उत्तर प्रदेशमधील प्रयागराज करण्यात आले आहे. महाकुंभमेळ्यात पवित्र स्नान केल्यानंतर लाखो भाविक, पर्यटक अयोध्येत जाऊन रामलल्लाचेही दर्शन घेत आहेत. राम मंदिरात दररोज सुमारे तीन-चार लाख भाविक दर्शन घेत आहेत. आतापर्यंत सुमारे एक कोटी भाविकांनी रामलल्लाचे दर्शन घेतले असून १५ कोटींचे दान तिजोरीत जमा झाले आहे. हा आकडा रोज वाढतोय.

### केसरी टूर्सचे संस्थापक अध्यक्ष केसरीभाऊ पाटील यांचे निधन



**मुंबई** : 'पर्यटक देवो भव:' या संकल्पनेतून स्थापना झालेल्या केसरी टूर्सचे संस्थापक व अध्यक्ष केसरीभाऊ पाटील यांचे वृद्धापकाळाने शनिवारी (दि. १५) निधन झाले. ते ९० वर्षांचे होते. त्यांना पर्यटन क्षेत्रातील चालते-बोलते विद्यापीठ म्हणून संबोधले जायचे. त्यांच्या पश्चात दोन मुलगे, सूना, दोन मुलगी, जावई, नातवंडे असा परिवार आहे.

# शिवजयंतीनिमित्त उलवे नोडमध्ये महाराष्ट्राची महासंस्कृती कार्यक्रम



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

महाराष्ट्राचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराजांच्या जयंतीनिमित्त येत्या बुधवारी (दि. १९) उलवे नोडमधील रामशेठ ठाकूर मैदानावर छत्रपती शिवाजी महाराज अश्वारूढ पुतळा उभारणी व सुशोभीकरण समितीच्या वतीने महाराष्ट्राच्या लोकसंस्कृतीवर आधारित मराठमोळा कलाविष्कार असलेला महाराष्ट्राची महासंस्कृती या दर्जेदार कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

उलवे नोड सेक्टर १२मधील प्लॉट क्रमांक ६ येथील रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूलजवळील या मैदानावर सायंकाळी ६ वाजता होणाऱ्या या कार्यक्रमाला छत्रपती शिवाजी महाराज अश्वारूढ पुतळा उभारणी व सुशोभीकरण समितीचे अध्यक्ष लोकनेते रामशेठ ठाकूर, उपाध्यक्ष जे.एम. म्हात्रे, पनवेल विधानसभा आमदार प्रशांत ठाकूर, उरण विधानसभा आमदार महेश बालदी, विधान परिषद आमदार विक्रांत पाटील, कोकण म्हाडाचे माजी सभापती बाळासाहेब पाटील, समितीचे उपाध्यक्ष व भाजपचे तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत, समितीचे सरचिटणीस व काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष महेंद्र घरत यांच्यासह अनेक मान्यवरांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे.

महाराष्ट्राची महासंस्कृतीमध्ये लोककला, लोकसंगीत, गणगवळणी, लावणी, अभंग, पोवाडा, बहुरंगी संगीत आणि नृत्यरचनांचा समावेश असून विशेषतः शिवराज्याभिषेक सोहळा सादर होणार आहे. या कार्यक्रमाचा नागरिकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन छत्रपती शिवाजी महाराज अश्वारूढ पुतळा उभारणी व सुशोभीकरण समितीच्या वतीने करण्यात आले आहे.

## राजिपमध्ये अपहार करणाऱ्याचे निलंबन

**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड जिल्हा परिषदेत खोटी स्वाक्षरी करून परस्पर देयके मंजूर करण्यात आली असून आर्थिक अफरातफर करणारा कर्मचारी नाना एकनाथ कोरडे याच्यावर मुख्य



कार्यकारी अधिकारी डॉ. भरत बास्टेवाड यांनी निलंबनाची कारवाई केली आहे.

वरिष्ठ सहाय्यक असलेल्या नाना एकनाथ कोरडे याने ग्रामीण पाणीपुरवठा, रा.जि.प. उपविभाग अलिबाग अंतर्गत येणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या नावे एक कोटी १९ लाख लाख इतकी रक्कम वेतन देयकामधून जादा प्रदान केली व ग्रामीण पाणीपुरवठा उपविभाग अलिबाग उपअभियंता यांची खोटी स्वाक्षरी करून परस्पर देयके मंजूर केली असून आर्थिक अफरातफर केली. ही बाब लक्षात नाना कोरडे याच्यावर महाराष्ट्र जिल्हा परिषद, जिल्हा सेवा (वर्तणूक) नियम १९६७मधील नियम ३चा भंग केला असल्याचा ठपका ठेवण्यात आला आहे. त्यानुसार कोरडे यांचे निलंबन करण्याचे आदेश मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. बास्टेवाड यांनी जारी केले आहेत.

# दाढीवाल्यांना हलक्यात घेऊ नका!

## उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेंचा उद्धव ठाकरेंना इशारा

**रत्नागिरी : प्रतिनिधी**

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची शनिवारी (दि. १५) रत्नागिरीत जाहीर सभा पार पडली. या सभेत बोलताना त्यांनी माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्यासह महाविकास आघाडीवर जोरदार हल्लाबोल केला. 'ते म्हणायचे की कोण एकनाथ शिंदे, कोण रामदास कदम? पण आम्ही कोण आहोत हे त्यांना दाखवून दिले. त्यामुळे दाढीवाल्यांना हलक्यात घेऊ नका,' असा इशारा उपमुख्यमंत्री शिंदे यांनी उद्धव ठाकरेंना दिला.

उपमुख्यमंत्री शिंदे म्हणाले, नारायण राणेंना सर्वात जास्त माहिती आहे की कुणाचे खोके कुठे आहेत? या महाराष्ट्रातील जनतेने विरोधकांना खोक्यात बंद करून टाकले. आता तरी खोके म्हणायचे बंद करा, पण रस्सी जळाली तरी रस्सीचा पीळ जात नाही. कोकणात शिवसेना वाढवण्यासाठी नारायण राणे आणि रामदास कदम यांनी त्या काळात खूप काम केले. मीदेखील नेहमी सांगायचो जर पक्ष मोठा करायचा असेल तर कार्यकर्त्यांना बळ द्या, त्यांना वाढवा, मात्र याबाबतचा अनुभव रामदास कदम यांनी घेतला. नारायण राणे यांनी देखील याचा अनुभव घेतला.



शिवसेना हा पक्ष कार्यकर्त्यांचा पक्ष आहे. आपल्या पक्षात कोणीही मालक नाही, असे त्यांनी उद्धव ठाकरेंवर टीका केली.

माझ्यावर आरोप करण्यापेक्षा आणि टीका करण्यापेक्षा लोक तुम्हाला का सोडत आहेत? याचा विचार करा, आत्मपरीक्षण करा. दाढीने तुम्हाला अगोदर कमाल दाखवली आहे. होती दाढी म्हणून उद्ध्वस्त झाली तुमची महाराष्ट्र विरोधी आघाडी आणि सुरू झाली विकासाची गाडी. त्यामुळे कशाला माझ्या नादाला लागता. मी आरोपाला आरोपाने उत्तर देत नाही, तर मी कामाने आरोपाला उत्तर देतो, असे म्हणत मुख्यमंत्री शिंदेंनी उद्धव ठाकरेंवर घणाघात केला.

# वसंत ऋतूच्या आगमनाची चाहूल

## निसर्गाचे अनोखे रूप स्थानिकांसह पर्यटकांचे वेधतेय लक्ष

**पाली : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यात वनसंपदेचा अमूल्य ठेवा आहे. वेगवेगळ्या ऋतूत येथील वृक्षराजींचे अनोखे रूप पहायला मिळते. सध्या वसंत ऋतूच्या आगमनाची चाहूल लागली आहे आणि यादरम्यान अनेक झाडांची पानगळ सुरू झाली आहे, तर काही झाडांना रंगेबिरंगी कोवळी पाने फुटत आहेत. जंगल, गाव, शहरे व रस्त्याच्या दुतर्फा हे दृश्य अनेकांचे लक्ष वेधून घेत आहे.



> *रायगड जिल्ह्यात विविध प्रकारची वनसंपदा आढळते. ऋतुमानानुसार त्यातील काहींची पानगळ होते, तर काहींना नवीन पालवी फुटते. हे वैशिष्ट्यपूर्ण चक्र निसर्ग नियमाने सुरू आहे. निरनिराळ्या भागात हा कालावधी वेगवेगळा आढळून येतो.*
>
> **-अमित निंबाळकर,**
> वनस्पती अभ्यासक

ऐन, सावर, साग, पांगारा आदी झाडांची पानगळ झाली आहे, तर करंज, जांभूळ, उंबर, पिंपळ व पळस आदी झाडांना नवीन कोवळी पालवी फुटत आहे. विशेष म्हणजे प्रत्येक झाडाची पालवी विविध लक्षवेधी आकार तसेच गर्द पोपटी, लाल, हिरवा आदी आकर्षक रंगाने वैशिष्ट्यपूर्ण आहे. सूर्याची किरणे या पानांवर पडल्यावर जणू काही पानांच्या रंगांची उधळण झाल्याप्रमाणे वाटते. त्यामुळे ही पाने नागरिक व पर्यटक यांचे लक्ष वेधून घेते.

पानगळ झालेल्या झाडांमधून कोवळ्या पालवीचे मनमोहक धुमारे फुटलेले एखादे झाड दृष्टिक्षेपात पडले की अनेकांचे लक्ष वेधते. कित्येकांचे मन प्रसन्न करते. वाढत्या उष्म्यात ही कोवळी पालवी डोळ्यांना गारवा देते. या झाडाखाली आलेल्यांना शितल सावली देते तसेच असंख्य पशुपक्षांचे आश्रयस्थान बनते. कित्येक निसर्गप्रेमी व वनअभ्यासक या झाडांचे निरीक्षण करताना दिसतात. अनेक हौशी लोक व पर्यटक आवर्जून कोवळी पालवीने बहरलेल्या झाडांचे छायाचित्रही घेतात. एकूणच निसर्गाची रंगपंचमी सुरू झाल्याचे दिसून येते.

# रायगडातील धरणांमध्ये ६० टक्के पाणीसाठा

**अलिबाग : प्रतिनिधी**

लघुपाटबंधारे विभागाच्या अखत्यारीत येणाऱ्या रायगड जिल्ह्यातील २८ धरणांत सध्या केवळ ६० टक्केच जलसाठा उपलब्ध आहे. ढोकशेत (सुधागड), रानिवली (श्रीवर्धन), कोथुर्डे (महाड) या धरणांमध्ये तर केवळ ४० टक्केच जलसाठा आहे. त्यामुळे प्रशासनाची चिंता वाढली आहे. पावसाळ्यापर्यंत हा जलसाठा पुरवण्यासाठी नियोजन प्रशासनाला करावे लागणार आहे.

### पावसाळ्यापर्यंत जलसाठा पुरवण्यासाठी नियोजन आवश्यक


लघुपाटबंधारे विभागाच्या अखत्यारीत रायगड जिल्ह्यात २८ धरण आहेत. सुधागडमध्ये पाच, महाड चार, श्रीवर्धन, खालापूर व पनवेल प्रत्येकी तीन, म्हसळा व कर्जत प्रत्येकी दोन, तर मुरूड, तळा, रोहा, पेण, अलिबाग, उरण प्रत्येकी अशी १३ तालुक्यात एकूण २८ धरणे आहेत. यामधून जिल्ह्यातील आणि नवी मुंबईतील नागरिकांना पाणीपुरवठा करण्यात येतो.

जिल्ह्यातील या धरणांमध्ये ६८.२६१ दलघमी पाण्याच्या साठ्याची क्षमता आहे. सध्या या धरणांमध्ये ५९.८५ टक्के पाणीसाठा शिल्लक आहे. त्यामुळे या वर्षीही पाणीटंचाईच्या झळा जिल्ह्याला बसणार आहेत. अनेक धरणे ही ३० ते ४० वर्षांपूर्वी बांधण्यात आली आहेत. या धरणांच्या बांधकामासाठी मातीचा वापर करण्यात आला होता. त्यामुळे यातील काही प्रकल्पात गळती लागली आहे. गळती लागल्यामुळे धरणांमध्ये पुरेसा पाणीसाठी होत नाही.

ढोकशेत (सुधागड), रानिवली (श्रीवर्धन), कोथुर्डे (महाड) या धरणांमध्ये ४० टक्के पाणी आहे. कवळे, घोटवडे, उन्हेरे, (सुधागड), वरंध, खिंडवाडी, खैरे (महाड), साळोख (कर्जत) या धरणांमध्ये ५० टक्के जलसाठा आहे. फणसाड (मुरूड), श्रीगाव (अलिबाग), कार्ले, कुडकी, (श्रीवर्धन), अवसरे (कर्जत), डोणवत (खालापूर), पुनाडे (उरण), बामणोली, उसरण (पनवेल), कोंडगाव (सुधागड) ७० टक्के पाणी आहे, तर वावे (तळा), सुतारवाडी (रोहा), आंबेघर (पेण), पाभरे, संदेरी (म्हसळा), भिलवले, कलोते-मोकाशी (खालापूर), मोरबे (पनवेल) या धरणांमध्ये ९० टक्के पाणीसाठा आहे.

पाणीटंचाईचे निर्मूलन करण्यासाठी जिल्ह्यात दीड हजाराहून अधिक योजना जलजीवनच्या माध्यमातून राबवण्यात आल्या, परंतु अनेक योजनांची कामे अर्धवट आहेत. ज्या योजना पूर्ण झाल्या आहेत त्यांचे हस्तांतरण रखडले आहे. ते झाल्यास जलपरिस्थिती सुधारेल.

# सुनहरा संसार ५० वर्षे




झूम प्रहर



**दिलीप ठाकूर**
चित्रपट समीक्षक

आजचा चित्रपट अनेक बाबतीत खूपच पुढे गेलाय. आजच्या कलाकारांचेच बघा. त्यांना एखाद्या विशिष्ट चौकटीत/प्रतिमेत (इमेजमध्ये) अडकणे मंजूर नाही.

अमिताभ बच्चनचेच बघा. तो आजच्या पिढीचा कलाकार कसा हो असा थेट प्रश्न तुम्ही नक्कीच कराल. अहो, त्याच्याच काय, कोणाच्याच वयावर जाऊ नका. तो आज प्रत्येक चित्रपटात वेगळा असतो. 'ब्लॅक'मधला वेगळा, 'पा'मधला एकदमच वेगळा काल्कीमधला त्याहीपेक्षा वेगळा.

पन्नास वर्षापूर्वी असे नव्हते. फरिदा जलालने शक्ती सामंता दिग्दर्शित 'आराधना'मध्ये (१९६९) पित्याच्या भूमिकेतील राजेश खन्नाची नायिका शर्मिला टागोर असताना पुत्र राजेश खन्नाची नायिका साकारली आणि तिला सहनायिकेच्याच भूमिका मिळत गेल्या. रवि टंडन दिग्दर्शित मजबूर (१९७४)मध्ये अमिताभ बच्चनची बहिण साकारल्यावर त्याच पठडीतील भूमिका तिला कराव्या लागल्या.

नायिका ही सर्वगुणसंपन्न असे. छान छान आकर्षक दिसणे, गोडधोड बोलणे, नायकासोबत प्रेम दृश्यात व गाण्यात रंग भरणे हेच तिचे पडदाभर काम. खलनायिका म्हणजे भडक मेकअप, तोकडे कपडे, व्हीलनला कंपनी देणे, एकादा क्लब डान्स करणे (त्याला फिल्मी भाषेत कॅब्रे डान्स का म्हणत?) हीच तिची ठरलेली कामे.

असे सगळेच सेटिंग/फिटींग असतानाच रुपडे नायिकेचे आणि काम नकारात्मक असाही एक फंडा असे. ड्रीम गर्ल म्हणून इमेज/ओळख/लोकप्रियता असलेल्या हेमा मालिनीने तशी नकारात्मक व्यक्तिरेखा साकारणे ही आश्चर्यचकित करणारी गोष्ट. काही झाले तरी ड्रीम गर्ल हेमा मालिनी सिनेमात का असेना, पण निश्चितच कसलेच वाईट कृत्य करणार नाही हा तिच्या तर झालेच, पण हिंदी चित्रपटावर बेहद्द प्रेम करणाऱ्यांचा शंभर टक्के विश्वास. ही खरंतर जमेची बाजू आहे. पिक्चर कोणताही असो हेमा मालिनी सकारात्मक गोष्टीच करणार आणि त्याचसाठी दिग्दर्शकाने तिची निवड केली आहे ही एक प्रकारची श्रद्धा. रूपेरी पडद्यावरील कलाकारांना आपलेसे मानणे ही आपल्या देशातील चित्रपट प्रेक्षक संस्कृतीतील एक फंडा.

अशातच 'सुनहरा संसार' (मुंबईत प्रदर्शित २१ फेब्रुवारी १९७५. पन्नास वर्ष पूर्ण झालीदेखील)ची रेडिओ विविध भारतीवर, मुद्रित माध्यमातून पूर्वप्रसिद्धी सुरू होताच त्यात म्हटले जाई, हेमा मालिनी अलग अंदाज मे.... चित्रपटात राजेंद्रकुमार, माला सिन्हा यांच्यासह हेमा मालिनी. सत्तरच्या दशकाच्या मध्यापर्यंत राजेंद्रकुमार व माला सिन्हा हे मागील पिढीतील नायक नायिका म्हणून ओळखले जात होते. धुल का फूल, देवरभाभी, गीत इत्यादी चित्रपटात त्यांनी एकत्र भूमिका साकारलेली. साठच्या दशकात राजेंद्रकुमार ज्युबिली कुमार म्हणून ओळखला जाई. त्याचा प्रदर्शित होणारा






जवळपास प्रत्येक चित्रपट हमखास पंचवीस आठवड्यांचा मुक्काम करे. राजेश खन्नाचा झंझावात सुरू होताच शम्मी कपूर, राजेंद्रकुमार यांची हिरोगिरी गोत्यात आली. सुनील दत्तही काही काळ मागे पडला. या चित्रपटसृष्टीत सुपरहिट चित्रपट म्हणजेच बरेच काही असते. अमिताभ बच्चनचा ॲन्ग्री यंग मॅन अर्थात सूडनायकाचे वादळ येताच राजेश खन्नाचीही काही काळ पडझड झाली. नायिकांचेही तरुण युग आले होते आणि हे प्रत्येक काळात होतच असते. नवीन पिढी येणार, त्यात जुन्यांनी बदलून वा जुळवून घ्यायचे असतेच. अमिताभ बच्चनने ते नवीन पिढीतील दिग्दर्शकांशी जुळवून घेत घेत अस्सल व्यावसायिकता दाखवली.

ए. सुब्बाराव दिग्दर्शितसुनहरा संसार हा त्यांनीच दिग्दर्शित केलेल्या पंडती कपूरम (१९७२) या तेलगू चित्रपटाची रिमेक. मूळ गोष्ट एम. प्रभाकर रेड्डी यांची, हिंदीत इंदर राज आनंद यांनी लेखन केले. मूळ साचा तसाच ठेवून हे चित्रपट रिमेक होत. साठच्या दशकापासून दक्षिण भारतीय प्रादेशिक भाषेतील चित्रपटाची रिमेक संस्कृती आलीय. त्या काळात अधूनमधून भूत मेरा साथी, अप्पू राजा असे काही साऊथचे चित्रपट हिंदीत डब होऊन येत. बाहुबली (२०१४)पासून ते मुख्य प्रवाहात आले आणि ग्लोबल युगातील डिजिटल पिढीसमोर ते पॅन इंडिया म्हणून स्थिरावलेत. त्यांचा आपला हुकमी प्रेक्षकवर्ग वाढत वाढत गेला.

भरपूर कौटुंबिक सामाजिक पण काहीसे भडक नाट्य हे त्या काळातील साऊथच्या पिक्चर्सचे वैशिष्ट्य. सर्वसामान्य प्रेक्षक त्यात गुंतत जाई.

शंकरलाल (ओम प्रकाश) यांचे धाकटे तीन भाऊ मधु (रमेश देव), चंद्रशेखर (राजेंद्रकुमार) आणि रवि (रोमेश शर्मा), आणि त्यात शंकरलालच्या पत्नीची शेवटची इच्छा असते चंद्रशेखरने लक्ष्मी (माला सिन्हा)शी लग्न करावे. त्याच सुमारास मधु जिल्हा अधिकारी म्हणून याच गावात बदली झाल्याने येतो. मधु चमन (डेव्हिड) यांची मुलगी शोभा (सीमाताई देव) यांच्याशी विवाहबद्ध होतो. गावातील मोठ्या घरात हे एकत्र कुटुंब वावरत असताना अधूनमधून चंद्रशेखर व मधु यांच्यात खटके उडत असतात. त्यासह हे कुटुंब वाटचाल करीत असताना चंद्रशेखर व लक्ष्मी यांना एकेक करत तीन मुलेही होतात. ती छोटा काका रविसोबत खेळतात, गातात. अशातच गावातील मोठ्या प्रतिष्ठित कारखान्याची मालकीण सविता अर्थात राणी पद्मावती (हेमा मालिनी) कामगारांच्या संपाने, मागण्याने हैराण असते, संतापलेली असते आणि या संपाचे नेतृत्व चंद्रशेखरकडे असल्याने तर तिचा राग अनावर झाला होता. ती चंद्रशेखरवर चोरीचा आळ आणते. इतक्यावरच ती थांबत नाही. ती चंद्रशेखरच्या कुटुंबाची जमीन व संपत्तीही हडप करते.

हे सगळे ती सूड म्हणून करीत असते. पण का? तर चंद्रशेखर व सविताचे पूर्वसंबंध...

साऊथच्या पिक्चरमध्ये अशा गोष्टी भरपूर नाट्यमय दृश्य, जोरदार संवाद, गीत संगीताची रेलचेल यातून मांडली जाई. मूळ पिक्चर सुपर हिट असल्यानेच त्याची रिमेक बनणे हा अलिखित नियमच. चित्रपटात रमेश देव व सीमाताई देव हे पती पत्नीच्या भूमिकेत हे उल्लेखनीय. रमेश देव यांनी दूरदृष्टी ठेवून साठच्या दशकातच हिंदी चित्रपटातून भूमिका साकारण्यास सुरुवात केली आणि आपला ठसा तेथेही उमटवला.

दिग्दर्शक ए. सुब्बाराव हे तेलगू चित्रपटात यशस्वी. आपल्याच सुपर हिट चित्रपटांची त्यांनी हिंदीत सातत्याने रिमेक केली. मिलन (१९६७), मन का मीत (१९६९), डोली (१९६९), दर्पण (१९७०), मस्ताना (१९७०), रखवाला (१९७१), जीत (१९७२), इन्साफ (१९७३), ज्वार भाटा (१९७३)हे त्यांनीच दिग्दर्शित केलेले चित्रपट. तेलगूतही असेच सातत्य. एका वर्षात दोन चित्रपट हे सातत्य केवळ कामावरचा फोकस कायम ठेवल्यानेच शक्य असते. माणसं उगाच मोठी होत नाहीत. गुणवत्ता आणि व्यावसायिक शिस्त यांची ते सांगड घालतात.

आनंद बक्षी यांच्या गीतांना नौशाद यांचे संगीत हा योग या चित्रपटाच्या निमित्ताने प्रथमच जुळून आलेला आणि किशोरकुमारही पहिल्यांदाच नौशाद यांच्या संगीत नियोजनात गायलेला. हॅलो हॅलो क्या हाल है (आशा भोसले व किशोरकुमार) हे ते गाणे. चित्रपटाने मुंबईत मेन थिएटर स्वस्तिक चित्रपटगृहात शंभर दिवसांचा मुक्काम केला. चित्रपट सर्वसाधारण असूनही हे बरे यश म्हणायचे.

हेमा मालिनी नकारात्मक भूमिकेत ही गोष्ट रंजक. (नकारात्मक म्हणजे खलनायिका अथवा व्हॅम्प नव्हे हेही सांगायलाच हवे.) बरं हे पहिल्यांदाच घडत नव्हते. एफ.सी. मेहरा निर्मित व सुशील मुजुमदार दिग्दर्शित 'लाल पथ्थर'मध्ये (१९७२) सौदामिनी ही अशीच नकारात्मक भूमिका होती. राजकुमार, हेमा मालिनी, राखी गुलजार, विनोद मेहरा इत्यादींच्या प्रमुख भूमिका असलेल्या या चित्रपटाची राजघराण्यातील गोष्ट अनेक वळणे घेत घेत रंगते. ती गुंतागुंत चित्रपट रसिकांना अजिबात आवडली नाही. चित्रपट समजायला सोपा असावा हीच पहिली अपेक्षा असते. रांगेत उभे राहून एकदाचे तिकीट मिळवायचे आणि त्याच पब्लिकला कोड्यात टाकायचे हे कसे आवडणार?

'सुनहरा संसार'देखील साधारण यशावर थांबला. गंमत कशी ती बघा, १९७५ साल अनेक बाबतीत वैशिष्ट्यपूर्ण. हिंदी चित्रपटाच्या क्षेत्रात एकदम वेगळेच.

२४ जानेवारीला 'दीवार', ३१ जानेवारीला 'आयना', १४ फेब्रुवारीला 'आंधी आणि रफ्तार', २१ फेब्रुवारीला 'सुनहरा संसार', २८ फेब्रुवारीला 'दफा ३०२', ३० मे 'जय संतोषी मां' असे करत करत १९७५ रंगत रंगत गेले.

आणखी एक विशेष प्रकाश मेहरा दिग्दर्शित हाथ की सफाई (१९७४) या चित्रपटात लहानपणी पहिल्याच रिळात हरवलेले दोन भाऊ (रणधीर कपूर व विनोद खन्ना) शेवटच्या रिळात एकमेकांना ओळखतात या मसाला मिक्स पिक्चरमध्ये हेमा मालिनीने तू क्या जाने बेवफा असा उगाच भडक वाटावा असा क्लब डान्स साकारल्याने अनेक जण अचंबित झाले होते. अतिशय लयबद्ध आणि उत्तम असे ते नृत्य होते, पण हेमा मालिनीने ते साकारावे? असा प्रश्न अनेकांना पडला होता.

कलाकाराने त्याच्या इमेजपेक्षा काही हटके केले की हे असं होण्याचे ते दिवस होते. 'सुनहरा संसार' तसाच. त्याच्या प्रदर्शनास पन्नास वर्ष पूर्ण झाल्यानिमित्त हा फोकस. आजच्या ग्लोबल युगातील डिजिटल पिढीला पन्नास वर्षांपूर्वीच्या चित्रपटांबाबत असलेल्या उत्सुकतेत हाही एक चित्रपट.

---

# 'छावा' अप्रतिम कलाकृती





आज सकाळीच छावा चित्रपटाचा पहिला शो पाहून आलो. स्वराज्याचे दुसरे छत्रपती, परमप्रतापी, धर्मवीर, स्वराज्य रक्षक संभाजी महाराज यांच्या पराक्रमावर, शौर्यावर, बलिदानावर चित्रपट येतो आहे याची आणि संभाजी महाराजांच्या आयुष्यात नक्की काय घडले ते कसे दाखवणार याची प्रचंड उत्कंठा गेल्या पंधरा दिवसापासून प्रेक्षकांना होतीच. भल्या पहाटे मला प्रेक्षकांचा उदंड प्रतिसाद दिसला.

भारतभूमीची रक्षा करणाऱ्या हिमालयाची उंची या चित्रपटातून छत्रपती संभाजी महाराजांना लाभली असेच म्हणायला हवे. स्वराज्य म्हणजे काय? मराठा म्हणजे काय? महाराष्ट्र 'महा' म्हणजे काय? स्वराज्यात संभाजी महाराजांच्या आयुष्यात काय घडले? त्यांनी कशासाठी बलिदान दिले? या प्रश्नांची उत्तरे देशवासीयांना हा चित्रपट पाहून समजतील. सुरुवातीपासून म्हणजे बुऱ्हाणपूरच्या लढाईपासून हा चित्रपट आपला ताबा घेतो. पुढे उत्कंठा वाढवत मन घट्ट करायला लावतो आणि शेवटी डोळ्यातून अश्रू ओघळवायला लावतो. चित्रपट निःशब्द करतो. चित्रपटातील भव्यता, व्यापकता, लढाई, शौर्य आणि हळवे दृश्य सर्वच सर्व अप्रतिम उठवले आहे.

देशभरातल्या इतर प्रांतातील अमराठी भाषिकांना ज्यांना फक्त छत्रपती शिवाजी महाराजांचा इतिहास माहिती आहे आणि ज्यांना छत्रपती संभाजी महाराजांच्या बलिदानाचा इतिहास माहित नाही त्यांना १७व्या शतकातील मराठा साम्राज्याचा इतिहास समजेल अशी मांडणी उत्तमरीत्या केली आहे. गनिमी काव्याने किंवा बेदरकारपणे मरणाला न घाबरता मराठा योद्धा लढण्यासाठी कसा सिद्ध होतो हे ॲक्शन दृश्यांद्वारे दाखवले आहे.

विकी कौशलच्या आयुष्यातील ही अप्रतिम फिल्म ठरावी. त्याच्या नजरेतील आग आणि त्याची हर हर महादेवची गर्जना टॉकीजमध्ये ऊर्जा निर्माण करते. विकी कौशलने खूप जीव ओतून काम केलेय. शेर शिवाजी का छावा जखमी झाल्यानंतर कसा थरकाप उडवतो ते रोमांच पाहताना आणि ऐकताना रौद्र रूप अनुभवायला मिळते. रश्मिका मंदाना सोज्वळ तितकीच कणखर मराठा स्त्रीची भूमिका समर्थपणे निभावताना दिसली. औरंगजेबाची भूमिका करताना अक्षय खन्ना यांची अस्वस्थपणे थरथणारी देहबोली, चालतानाची हतबलता, ओठांची हालचाल, भेदक कट्टरपणा आणि वृद्धत्वाकडे झुकलेला त्याला केलेला साजेसा मेकअप साक्षात टोप्या विणणारा पाताळयंत्री औरंगजेब असाच असावा याचा भास होतो.

संभाजी महाराजांचेच नातलग गणोजी आणि राणोजी शिर्के यांनी फितुरी केल्यानंतर संभाजीराजांना संगमेश्वरला पकडले जाते. त्यापूर्वीची घनघोर लढाई पडद्यावर नव्हे तर प्रत्यक्ष रणांगणावरच पाहतो आहोत असे वाटते. संभाजी महाराजांचे लढाईतले प्राविण्य आणि शस्त्र-अस्त्रांचा सफाईने केलेला वापर कुठेही नकली वाटत नाही. पकडल्यानंतर ४० दिवस अतोनात अत्याचार केले जातात. साखळदंडमध्ये जखडलेल्या अवस्थेत उभ्या उभ्या प्राण सोडताना जेव्हा संभाजी महाराज 'आईसाहेब' बोलतात तेव्हा आपण गहिवरतो, लटपटतो आणि संतापून रक्त खवळते इतके परिणामकारक दृश्य दिग्दर्शक लक्ष्मण उतेकरांनी उभे केले आहे. काळालाही दरदरून घाम फोडणारा हा नृसिंह शिवप्रभूंच्या छावा हातापायात साखळदंड बांधलेला असतानाही या छाव्याला कुणी जखडून ठेवू शकत नाही हा प्रसंग संभाजी महाराजांची अचाट ताकद दाखवतो. शरणांगत होण्यासाठी जखमेवर मीठ चोळले जाते, नखे उपटली जातात, जीभही उपटली जाते आणि औरंग्यासमोर कधीही न झुकणारी नजर कायमची बंद करण्यासाठी डोळेही काढले जातात, हे सर्व पाहताना पडद्यावरची कळ आणि त्यांच्या तोंडून उमटणारा जगदंब शब्द प्रेक्षकांच्या हृदयात खोलवर घुसतात. हे दुर्दैवी प्रसंग काळजावर दगड ठेवून बघावे लागतात. या वेदनेसह भलमोठं दुःख घेऊन आपल्याला चित्रपटगृहाबाहेर पडावे लागते. शेवटची २५ मिनिटे खूपच अस्वस्थ करून जातात. पडद्यावरील यातना पाहताना आपल्याला सहन होत नाहीत, राजांनी त्या कशा सहन केल्या असतील.

महाराष्ट्रातल्या मराठी बांधवांनी आपल्या कुटुंबासह हा चित्रपट का पाहवा तर या चित्रपटाने मराठी माणसांची आणि महाराष्ट्राच्या इतिहासाची पुनर्बांधणी केली आहे. हा चित्रपट देशभरच्या तरुणांना प्रेरणा देणार, चेतना आणि देशप्रेम जागविणार आणि हो... चित्रपट जरी शेर का छावा म्हणजे शंभुराजे या इतिहासातील व्यक्तिरेखेवर आधारित असला तरी आबासाहेब म्हणजे थोरले छत्रपती शिवाजी महाराज यांच्यासाठी उतेकरांनी आवाज दिला आहे. संभाजी महाराजांच्या आयुष्यातील अवघड प्रसंगात तो धीर देणारा आश्वासक म्हणून वापरला आहे.

छत्रपती शिवाजी महाराजांची उणीव न भासवता हा आवाज सातत्याने चित्रपट व्यापून जातो आहे. चित्रपटाचे संगीत वेदनादायी आणि परिणामकारकता कसे असू शकते हे ए.आर. रेहमान यांनी ऐकवले आहे. 'लक्ष्मण उतेकर' हे नाव आज देशभर प्रेक्षकांच्या तोंडावर आहे. एक नयनरम्य, चित्तथरारक रोमहर्षक प्रेरणादायी अप्रतिम कलाकृती साकारली आहे. छत्रपती संभाजी महाराज यांच्या शौर्यावर, बलिदानावर छावा चित्रपट करून निर्माते, दिग्दर्शक आणि अभिनेते या सर्वांनी अमूल्य असे कार्य केले आहे. त्यांचे मनापासून अभिनंदन! मराठी माणसांनी एकत्र येऊन या समर्पणाची गाथा मोठ्या पडद्यावर पाहण्यासाठी प्रत्यक्ष जायला हवे. संभाजी महाराजांचे शौर्य अधिकाधिक लोकांनी पाहावे आणि त्यांच्या बलिदानातून तरुणांनी मोटिव्हेशन घ्यावे यासाठी हा चित्रपट करमुक्त करावा.

**-रवींद्र मालुसरे, मुंबई**

---

# सेनापती तात्या टोपे



१८५७च्या स्वातंत्र्यसमराच्या माध्यमातून भारतीय स्वातंत्र्याचा पाया रचणारे एक लढवय्ये सरदार म्हणजे पेशव्यांचे सेनापती तात्या टोपे! आज त्यांची जयंती. त्यानिमित्ताने घेतलेला आढावा.

हिंदुस्थानातल्या राष्ट्रभक्तांनी ब्रिटिश शासकांविरुद्ध पुकारलेले १८५७चे स्वातंत्र्यसमर ही इतिहासातील एक धगधगती घटना. सैनिकांमध्ये असंतोष पसरून १८५७ची ठिणगी पडली. या लढ्याच्या पार्श्वभूमीवर सेनापती तात्या टोपे हे मराठी नाव सुवर्णाक्षरांनी कोरले गेले. स्वातंत्र्यसमरातील महाराष्ट्राचे योगदान मोठे होतेच तसेच त्यामध्ये तात्यांचे स्थानही तेवढेच मोठे होते.

१८१४मध्ये नाशिक जिल्ह्यातील येवल्यातला तात्या टोपे त्यांचा जन्म. पांडुरंग टोपे यांच्या आठ अपत्यांपैकी तात्या हे दुसरे अपत्य. त्यांचे मूळ नाव रघुनाथ. त्यांचे नाव रामचंद्र असेही ठेवण्यात आले होते. रघुनाथचे वडील पेशव्यांकडे दानाध्यक्षाचे काम पाहण्यासाठी ब्रह्मावर्तास येऊन राहिले. पर्यायाने रघुनाथचे अर्थात तात्यांचे बालपण नानासाहेब पेशवे आणि राणी लक्ष्मीबाई यांच्याबरोबर गेले. पुढे बरीच वर्षे नानांच्या दरबारात तात्या कारकुनी कामांत गुंतलेले होते. १८५७च्या समरात ग्वाल्हेरहून तात्यांनी आणलेल्या सैन्यावर मुख्य सेनापती म्हणून नानासाहेबांनी त्यांचीच निवड केली. त्या वेळी तात्यांच्या कर्तृत्वाचा कस लागला. कानपूरवर चढाई करण्यासाठी तात्या सज्ज झाले.

१८५७मधील दिल्ली, लखनऊ, जगदीशपूर व कानपूर या ठिकाणच्या उठावांचे सूत्रधार तात्या टोपेच होते. त्यांचा धाडसी स्वभाव, गनिमी काव्याचे अवगत तंत्र, स्वदेशावरची श्रद्धा आणि स्वामिनिष्ठा यांच्या बळावर त्यांच्या तलवारीला धार आली होती. कानपूर, लखनऊ, झाशी असे कूच करताना तात्यांचा पराक्रम पणाला लागला. कमकुवत सैन्य, नियोजनाची कमतरता, पैसा-रसद-तोफा या साधनांची कमतरता असताना त्यांना यशापयशाची चव चाखायला लागत होती, पण तात्यांची ध्येयासक्ती प्रचंड होती.

नानासाहेब पेशवे यांचा अज्ञातवास, ग्वाल्हेरच्या लढाईत राणी लक्ष्मीबाईंचा पराभव या पार्श्वभूमीवर एकच मराठी वाघ शत्रूला तोंड देत होता. शत्रूवर जरब बसवत, वेळोवेळी इंग्रजांच्या तावडीतून सुटून पुढचे ध्येय गाठण्याचा त्यांचा यत्न इंग्रजांना मेटाकुटीला आणत होता. तात्यांच्या या पराक्रमाची गाथा जगभर पसरली. काही युरोपियन इतिहासकारांनी तात्यांच्या शौर्याचा गौरव त्या काळी केला होता.

तात्यांची एकाकी झुंज थकली, जिंकण्याची आशा लोपली. इंग्रजांपुढे वाकायचे नाही हा निश्चय मात्र कायम होता. तात्या शत्रूपासून बचाव करताना मानसिंग या मित्राच्या आश्रयाला गेले. तात्यांच्या पराक्रमाला थिटी पाडणारी घटना घडली, तात्यांचा मागमूस काढणारी इंग्रजी फौज मानसिंगापर्यंत पोहचली. मानसिंगाची फितुरी नडली आणि तात्या इंग्रजांचे कैदी झाले.

७ एप्रिल १८५९ रोजी आरोपांना उत्तर देताना तात्यांच्या चेहेऱ्यावर भीती नव्हती, अपराधीपणा नव्हता, दुःख तर नव्हतेच, होता तो देशाभिमान अन् हौतात्म्याचे समाधान! १८५७च्या स्वातंत्र्ययुद्धातल्या होमकुंडात तात्यांची शेवटची आहुती पडली. १८ एप्रिल १८५९ रोजी त्यांना मध्य प्रदेशातील शिवपुरी येथे फाशी देण्यात आले. या ठिकाणीच त्यांचा पुतळा उभारण्यात आलेला आहे. महाराष्ट्राचे ऊर दुःखाने, पण अभिमानानेही भरून आणणारी ही घटना तात्यांसारख्या मराठी वीराची ख्याती जगभर पसरवून गेली.

**(साभार : बुकस्ट्रक)**

# कालवा रोडची सुधारित मोजणी

## ◆ भाजप युवा मोर्चाचे रोशन चाफेकर यांचा पाठपुरावा
## ◆ खासदार तटकरेंच्या अधिसूचनेमुळे रहिवाशांना दिलासा

**धाटाव : प्रतिनिधी**

रोहा नगरपालिका हद्दीतील भुवनेश्वर कालवा रोड येथील १७ घरांचा प्रलंबित प्रश्न अखेर मार्गी लागण्याच्या दिशेने वाटचाल करत आहे. गेल्या अनेक वर्षांपासून रखडलेल्या या प्रकरणाला आता वेग आला असून, या समस्येच्या निवारणासाठी भारतीय जनता पक्ष युवा मोर्चा जिल्हा सरचिटणीस रोशन चाफेकर यांनी सातत्याने प्रयत्न सुरू ठेवले होते, परंतु आता त्यांच्या पाठपुराव्यामुळे प्रशासनाची दखल घेतली गेली असून, गट नंबर २६८ / १ अ ची १४ फेब्रुवारी रोजी प्रशासनाने



प्रत्यक्ष मोजणी केली.

महायुतीचे खासदार तटकरे यांची १६ जानेवारी २०२५ रोजी रोशन चाफेकर यांनी भेट घेऊन या प्रकरणाची सविस्तर माहिती दिली व लेखी निवेदन सोपवले. त्यांच्या सूचनेनुसार पुढील स्तरांवर हालचाली सुरू झाल्या. १० फेब्रुवारी रोजी प्रांताधिकारी खुटवड, मुख्याधिकारी एडके आणि भूमिअभिलेख विभागाचे अधिकारी संभाजी कांबळे यांच्यासोबत बैठक घेण्यात आली. यानंतर १३ फेब्रुवारी रोजी उपअधीक्षक भूमिअभिलेख योगेश कातडे यांच्याशी नागरिकांसोबत रोशन चाफेकर यांनी बैठक करून दिली. त्यांनी तातडीने १४ फेब्रुवारी रोजी या जागेची मोजणी करण्याचे आदेश दिले.

ही प्रक्रिया इतकी वर्षे रखडलेली असताना, आता जलदगतीने होत असल्याने नागरिकांमध्ये समाधानाचे वातावरण आहे. हे नागरिकांचे जीवनमान सुधारण्याचे आणि त्यांच्या हक्काचे प्रश्न सोडवण्याचे काम आहे. जो कोणी हे प्रश्न सोडवेल, त्याचे स्वागतच आहे त्यामुळे हा लढा सर्वांचा आहे, असे रोशन चाफेकर यांनी सांगितले.

कालवा रोडवरील १७ घरांच्या रहिवाशांनी चाफेकर यांच्या प्रस्तावाला लेखी पाठिंबा दिला असून, महायुतीचे खासदार राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष आदरणीय सुनिल तटकरे यांच्या सूचनेमुळे या प्रकरणाला अधिक बळ मिळाले आहे. तर राज्यात महायुती सरकार आहे आणि रायगडमध्ये युतीचे खासदार व आमदार असल्याने आगामी काळात अनेक प्रलंबित प्रश्न मार्गी लागतील, असा विश्वास रोशन चाफेकर यांनी व्यक्त केला. पुढील काळात मोजणीच्या कार्यवाहीनंतर रहिवाशांचे घरे अधिकृतरित्या नोंदवली जातील आणि त्यांच्या समस्या सुटतील, अशी अपेक्षा निर्माण झाली आहे.

# छत्रपती संभाजी महाराज स्मारकाचे काम अंतिम टप्प्यात

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत नगर परिषद हद्दीतील नानामास्तर नगरमध्ये तीस लाख रुपये खर्च करून धर्मवीर छत्रपती संभाजी महाराजांचे स्मारक उभारले जात आहे. आमदार महेंद्र थोरवे यांनी या स्मारकासाठी निधी उपलब्ध करून दिला आहे. या स्मारकचे काम अंतिम टप्प्यात आले आहे.

नानामास्तर नगरमधील श्री. सिद्धिविनायक मंदिराच्या शेजारी धर्मवीर छत्रपती संभाजी महाराजांचे स्मारक येथील युवकांनी उभारले होते. या स्मारकामध्ये अनेक समारंभ होत होते. येथील युवकांनी या स्मारकाचे नूतनीकरण करण्यासाठी आमदार महेंद्र थोरवे यांची भेट घेऊन त्यांना निवेदनद्वारे विंनती केली होती. आमदार थोरवे यांनी या स्मारकासाठी तीस लाख रुपयाचा निधी मंजूर करून उपलब्ध करून दिला.

गेली सहा-सात महिने या स्मारकाचे काम सुरू असून ते अंतिम टप्प्यात आले आहे. हे स्मारक दगड कोरून तयार केले जात असून एक चांगले स्मारक उभारले जात आहे.



# माणगाव येथे कायदेविषयक शिबिर

**माणगाव : बातमीदार**

माणगाव तालुका विधी सेवा समिती व माणगाव वकील संघटना यांच्या संयुक्त विद्यमाने माणगाव येथील नामदेव सुर्वे विधी महाविद्यालय येथे कायदेविषयक शिबिर शनिवारी (दि.१५) आयोजित करण्यात आले होते.



या शिबिरास तालुका विधी सेवा समितीचे अध्यक्ष तथा माणगाव येथील जिल्हा न्यायाधीश - हर्षल भालेराव, दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर गजानन फुलझळके, माणगाव वकील संघटनेचे अध्यक्ष ॲड. मोहन मेथा, उपाध्यक्ष ॲड.पुंडलिक मालोरे, ॲड.यशवंत साधू, ॲड. कौस्तुभ धामणकर, ॲड. रोशन पांढरे, ॲड. सनील महाडिक, ॲड. कविता ढाकवळ, ॲड. केतकी धामणकर, ॲड. मनोज गायकवाड, ॲड. सईम बहुर, ॲड. दुर्वेश मोरे उपस्थित होते.

शिबिरामध्ये ॲड. सईम बहुर यांनी माहितीचा अधिकार या विषयाबाबत मार्गदर्शन केले. ॲड. रोशन पांढरे यांनी आर्बीट्रेशन, मिडिएशन व लोकन्यायालय याबाबत कायद्यातील तरतुदींची माहिती दिली. न्यायाधीश गजानन फुलझळके यांनी कामाच्या ठिकाणी महिलांवर होणाऱ्या अत्याचाराबाबत माहिती व त्याबाबत असणाऱ्या कायदेशीर तरतुदींची माहिती दिली. न्यायाधीश हर्षल भालेराव यांनी अध्यक्षीय मनोगत व्यक्त केले.

शिबिरास नामदेव सुर्वे विधी महाविद्यालयाचे प्राचार्य श्री. राठोड आदी उपस्थित होते. माणगाव तालुका विधी सेवा समिती व माणगाव वकील संघटना यांच्यामार्फत नामदेव सुर्वे विधी महाविद्यालयाच्या सहकार्याने चांगल्या प्रकारे कायदेविषयक शिबिर झाले.

# निकम स्कूलमध्ये रोबोटिक्स व कृत्रिम बुद्धिमत्तेवर प्रदर्शन

**माणगाव : प्रतिनिधी**

माणगाव येथील एस.एस. निकम इंग्लिश स्कूलमध्ये १४ व १५ फेब्रुवारी असे दोन दिवस रोबोटिक्स व कृत्रिम बुद्धिमत्ता विषयावरील रायगड जिल्ह्यातील पहिलेच मॉडेल प्रदर्शन अतिशय वैज्ञानिक वातावरणात झाले.

या प्रदर्शनाचे उद्घाटन लोणेरे येथील डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठाचे रोबोटिक्स विषयातील तज्ञ प्रोफेसर डॉ. हर्षदीप जोशी यांच्या हस्ते झाले.

कार्यक्रमाचे अध्यक्ष संस्थेचे चेअरमन डॉ. मदन निकम हे होते, तर प्रमुख उपस्थितीत माणगावच्या नगराध्यक्षा शर्मिला सुर्वे, उपनगराध्यक्ष हर्षदा काळे, माणगाव मेडिकोजच्या अध्यक्षा डॉ. स्नेहा राऊत, खजिनदार डॉ.सायली चुटके, स्टेम रोबो कंपनीचे इंजिनियर वरून घोळे, शिक्षणाधिकारी



कार्यालय अलिबागचे अधीक्षक सुभाष शिंदे, माणगाव एज्युकेशन ट्रस्टचे सेक्रेटरी सुभाषभाई मेथा, खजिनदार अमृतभाई दोशी,संस्थेचे पदाधिकारी व सभासद आदी मान्यवर उपस्थित होते.

प्रदर्शनात विद्यार्थ्यांनी कृत्रिम बुद्धिमत्तेवर कार्य करणारी अनेक उपकरणे आणि रोबोट्स प्रदर्शित केले. प्रदर्शनाला विद्यार्थी, पालक, प्रतिष्ठित नागरिक व सामान्य जनतेने भेट देऊन विद्यार्थ्यांचे भरभरून कौतुक केले.

# अलिबाग येथे संत सेवालाल जयंती

**अलिबाग : प्रतिनिधी**

अलिबाग येथे श्री संत सेवालाल महाराज यांची २८६ वी जयंती साजरी करण्यात आली. यानिमित्त विविध धार्मिक कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते. अलिबाग शहरात मिरवणूक काढण्यात आली.

श्री संत सेवालाल महाराज जयंती उत्सव मंडळ, कामगार नाका अलिबाग बंजारा समाज यांनी श्री संत सेवालाल महाराज यांची २८६वी जयंती निमित्त विविध कार्यक्रम आयोजित केले होते. भजन, कीर्तन, भोग पूजा असे कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते.

आमदार महेंद्र दळवी आदी मान्यवरांनी अलिबाग कामगार नका येथे श्री संत सेवालाल महाराजांचे दर्शन घेतले. अन्यायाविरोधात लढा देत सत्य, अहिंसा व समतेचा संदेश देणारे श्री संत सेवालाल महाराज त्यांचे विचार, तत्त्वज्ञान आणि समाजसेवेची शिकवण आजही प्रेरणादायी आहे, असे आमदार महेंद्र दळवी म्हणाले.





# चिंचघर येथे बैलगाडी शर्यत, सरावासाठी नवीन माती बंदर

**रेवदंडा : प्रतिनिधी**

चिंचघर येथे बैलगाडी शर्यती व सरावासाठी नवीन माती बंदराचा शुभारंभ आमदार महेंद्र दळवी यांच्या हस्ते जल्लोषात झाला. चिचंघर येथील नेते सी.एम. ठाकूर व काकळघर सरपंच स्वस्तिक ठाकूर यांच्या प्रयत्नाने स्थानिक शेतकरी वर्गाच्या सहकार्याने नवीन बैलगाडी शर्यत माती बंदर तयार करण्यात आले आहे.

मुरूड तालुक्यातील बोर्ली पंचक्रोशीतील शेतकरीवर्गाचे बैलगाडी शर्यतीवर अतोनात प्रेम आहे. बैलगाडी शर्यतीसाठी लाखो रूपये किमंतीचे बैल स्थानिक शेतकरीवर्गाने त्यांनी मालकी हक्कात ठेवले आहे, मात्र बैलगाडी शर्यतीसाठी व शर्यतीच्या सरावासाठी माती बंदराचा अभाव बोर्ली पंचक्रोशीत जाणवत होता, त्यासाठी चिचंघर येथे बैलगाडी शर्यतीसाठी नवीन माती बंदर तेथील स्थानिक शेतकरीवर्गाच्या सहकार्याने तयार करण्यात आला आहे.

चिंचघर येथील बैलगाडी शर्यती व सरावासाठी नव्याने तयार करण्यात आलेल्या माती बंदराचा आमदार महेंद्र दळवी यांचे शुभहस्ते श्रीफळ वाढवून करण्यात आला. या वेळी चिंचघर चे नेते सि.एम.ठाकूर, शिवसेना अलिबाग तालुका प्रमुख अनंत गोंधळी, काकळघर ग्रा.प.सरपंच स्वस्तिक ठाकूर, शिवसेनेचे निलेश घाटवळ, शिवसेना ज्येष्ठ नेते मोहन ठाकूर, शिवसेना युवा सेना प्रमुख अमोल लाड, माजी मुरूड पंचायत समिती सदस्य रमेश नागावकर, शिवसेना युवा सेना उपाध्यक्ष विकी वेगस, पप्पुशेठ शिंदे आदी मंडळी व बैलगाडी शर्यत प्रेमी मंडळी यांची उपस्थिती होती.


या माती बंदर मैदान शुभारंभावेळी काकळघर ग्रा.प.सरपंच स्वस्तिक ठाकूर व चिंचघर नेते सी.एम. ठाकूर यांचे प्रयत्नाने बैलगाडी शर्यतीचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी तेरा गटात बैलगाडी शर्यत घेण्यात आली. या वेळी अंतिम विजेत्या बैलगाडीस सि.एम. ठाकूर यांचे हस्ते बक्षिस वितरण करण्यात आले.

बैलगाडी शर्यती व सरावासाठी नव्याने तयार करण्यात आलेल्या माती बंदराचा बैलगाडी शर्यत प्रेमी मंडळी व स्थानिक शेतकरीवर्ग यांनी विशेष शुभेच्छा नेते सी.एम. ठाकूर व काकळघर सरपंच स्वस्तिक ठाकूर यांना दिल्या.

# पोलादपूरातील ग्रामीण भागात वनराई बंधारे पाणीटंचाईवर उपयुक्त

**पोलादपूर : प्रतिनिधी**

पोलादपूर तालुक्यात वनराई बंधाऱ्यांबाबत सरकारी आकडेवारी फुगवून सांगण्याचा प्रकार दरवषीर होत असला तरी ज्या ज्या गावांमध्ये वनराई बंधारे यशस्वी झाले; त्या त्या गावात गुरांच्या पिण्याच्या पाण्यासोबतच महिलांना कपडे धुणे, भांडी घासणे आदी अन्य कामांसाठी बंधारे उपयुक्त ठरल्याचे दिसून आले. यंदा बंधाऱ्यांची सुरूवात झाल्याने नदी-नाल्यांतील पाणी आटून वाहून जाण्यापूर्वी प्रशासनाकडून वनराई बंधाऱ्यांसाठी प्रयत्न केले गेले आहेत.



पोलादपूर पंचायत समितीकडून प्राप्त माहितीनुसार पोलादपूर तालुक्यात ४४ वनराई बंधारे पंचायत समितीकडून बांधण्यात आल्याचे सांगण्यात आले. यामध्ये तुर्भे बुद्रुक, तुर्भे खुर्द, चरई, वाकण, महाळुंगे, कापडे बुद्रुक, मोरसडे, दिवील, पार्ले, उमरठ, चांभारगणी बुद्रुक, बोरावळे, गोळेगणी, वझवाडी, कुडपण, आडावळे, सवाद, माटवण, धामणदिवी, पळचिल, महालगुर, ओंबळी, पैठण, परसुले, कुडपण, कोंढवी, वझरवाडी, देवळे या ग्रामपंचायत हद्दीत प्रत्येकी एक वनराई बंधारा तसेच वाकण, सडवली, बोरघर, काटेतळी, देवपूर, धारवली, कालवली, तुर्भेकोंडा या ग्रामपंचायतींमध्ये प्रत्येकी दोन वनराई बंधारे तर कोतवाल खुर्द, कोतवाल बुद्रुक, बोरज, लोहारे, भोगाव, देवळे, मोरगिरी या ग्रामपंचायत हद्दीत एकही वनराई बंधारा बांधण्यात आला नसल्याचे आकडेवारीतून स्पष्ट होते.

पोलादपूर तालुक्यात जलजीवन योजनेतून अनेक ग्रामपंचायतींना पाणीपुरवठा योजना सुरू झाल्याचे सांगण्यात आले असले तरी ग्रामपंचायतींअंतर्गत महसुली गावांसाठी कोणतीही योजना कार्यान्वित नसल्याने दरवर्षीप्रमाणे यंदादेखील टँकरद्वारे पाणीपुरवठा करून संभाव्य टंचाईवर उपाय योजना करण्यासाठी फेब्रुवारी महिन्याच्या अखेरिस प्रस्ताव सादर करण्याची आवश्यकता महसुली गावांना भासणार आहे. ऑक्टोबर २०२५४ मध्ये विधानसभा निवडणुकीनंतरच्या काळात वनराई बंधाऱ्यांना सुरूवात न झाल्याने यंदा बंधाऱ्यांनी अडविलेल्या पाण्याचे प्रमाण कमी आहे.

या खेरिज तालुका कृषी कार्यालयामार्फत ४९ वनराई बंधारे बांधण्यात आले असून शेतकऱ्यांनी हे बंधारे बांधले आहेत. पोलादपूर तालुका कृषी विभागाने फळझाडांच्या लागवडीचे जोपासना आणि संवर्धन करण्यासाठी जलकुंडाचा गोळेगणी पॅटर्न यशस्वी करून पाणीटंचाई टाळली आहे. तहसील कार्यालय आणि वनविभागाकडून किती वनराई बंधारे बांधण्यात आले याबाबतची माहिती उपलब्ध झाली नाही, मात्र गुरांच्या पाण्याचा प्रश्न सुटण्यासोबतच ज्या गावात पिण्याच्या पाण्याची तीव्र टंचाई आहे; अशा गावांमध्ये नदीच्या पात्रातील दगड-गोटे बाजूला सारून डवरे खणून त्यात साचणारे पाणी हंडे-कळशा आणि अन्य भांडयांमध्ये साठविण्यासाठी सकाळ-संध्याकाळ महिला वर्गाची लगबग दिसून येत आहे.

# अनुदानासाठी मुदतवाढ

**रायगड : रामप्रहर वृत्त**

अल्पसंख्याक विकास विभागाकडून धार्मिक अल्पसंख्याक विद्यार्थीबहुल शासनमान्य खासगी, अनुदानित, विना अनुदानित, कायम विना अनुदानित शाळा, कनिष्ठ महाविद्यालये, औद्योगिक प्रशिक्षण संख्या, नगरपालिका, नगर परिषद शाळा व अपंग शाळांमध्ये पायाभूत सोयी-सुविधा पुरविण्यासाठी अनुदान योजना सन २०२४-२५ साठी प्रस्ताव सादर करण्यास मुदतवाढ देण्यात आली आहे.

जिल्ह्यातील इच्छूक शाळांनी शाळांमध्ये पायाभूत सोयी-सुविधा पुरविण्यासाठी अनुदान योजनेसाठी सन २०२४-२५ या आर्थिक वर्षाकरिता विहित नमुन्यातील अर्जासह प्रस्ताव जिल्हा नियोजन समिती, जिल्हाधिकारी कार्यालय, रायगड-अलिबाग यांच्याकडे २२ फेब्रुवारीपर्यंत सादर करावेत, असे आवाहन जिल्हा नियोजन अधिकारी तथा सदस्य सचिव, उच्चस्तरीय निवड समिती रायगड-अलिबाग जयसिंग मेहेत्रे यांनी केले आहे.

# शैक्षणिक व क्रीडा स्पर्धांचे पारितोषिक वितरण



**पाली : प्रतिनिधी**

टाटा कॅपिटल लिमिटेड व सुधागड तालुका रहिवासी सेवा संघ यांच्या संयुक्त विद्यमाने विविध शैक्षणिक व क्रीडा स्पर्धांचे बक्षीस वितरण संत नामदेव माध्यमिक विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय नांदगाव येथे स्व.नामदेवशेठ खैरे सभागृहात शुक्रवारी झाले.

या वेळी सुधागड तालुका रहिवासी सेवा संघ ठाणे अध्यक्ष विठ्ठल घाडगे, उपाध्यक्ष वसंत लहाने, शंकर काळभोर, समन्वयक बळीराम निंबाळकर, माजी अध्यक्ष विठ्ठल खेरटकर, कार्याध्यक्ष प्रकाश शिलकर, खजिनदार विजय जाधव, प्रसिद्धी प्रमुख अजय जाधव, गजानन जंगम, सल्लागार गणपत दिघे, संदीप गोफण, राजेश बामणे, प्राचार्य बबन पालवे तालुक्यातील सर्व शाळांचे मुख्यध्यापक, क्रीडा शिक्षक बक्षीस पात्र विद्यार्थी उपस्थित होते.

सुधागड तालुका रहिवासी सेवा संघात सर्व तालुक्यातील ग्रामीण भागातील कार्यकर्ते आहेत. गेली २० वर्षांपासून ही संस्था शैक्षणिक क्षेत्रात काम करत आहे असे कार्यक्रमाच्या प्रास्तविकेत समन्वयक निंबाळकर यांनी सांगितले.

विविध स्पर्धांमध्ये विविध शाळेचे शिक्षकांचे योगदान महत्त्वाचे आहे. त्याच्यामुळे विविध उपक्रम राबविणे शक्य होते. मागील १० वर्षात या संस्थेच्या माध्यमातून लाखो रुपयांची मदत विद्यार्थ्यांना केली आहे. हे सर्व करण्यामागचा हेतू विद्यार्थ्यांचा बौद्धिक शारीरिक विकास व्हावा हे आहे. वैयक्तिक क्रीडा स्पर्धेतून उत्तम खेळाडू तयार करणे. दहावी, बारावी विद्यार्थ्यांना करिअर मार्गदर्शन शिबिराचे आयोजन का करून विद्यार्थ्यांना प्रोत्साहन दिले जाते. तालुक्यातील देणगीदार आणि टाटा कॅपिटलच्या सीएसआर फंडातून पुढील शिक्षणासाठी शिष्यवृत्ती दिली जाते.

ही स्पर्धा घेण्यासाठी विविध शिक्षकानी मोलाचे सहकार्य केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुजित जगताप तर आभार प्रदर्शन महेंद्र निकुंभ यांनी केले.


## नावात बदल

मी खाली सही करणार **रेखा अविनाश धारिया (जुने नाव)**, ओप्प.आय.आय.टी.मेन गेट बी/८, श्रद्धा माता सोसायटी, आदी शंकर चर्या मार्ग, पोवई, मुंबई-४०००७६

मी माझे नाव महाराष्ट्र शासन राजपत्र नोंदणी क्रं.(एम-२४३८२५६६) अन्वये बदलले असून यापुढे मी **सुरेखा अविनाश कोटिया** या नावाने ओळखली जाईल.

**नवीन नावाने सही/-**
**सुरेखा अविनाश कोटिया**

# रिक्षा चोरणारा सराईत गजाआड

## पनवेल पोलिसांनी केली १८ वाहने जप्त

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल शहर पोलिसांनी सराईत ऑटो रिक्षा चोरणाऱ्या आरोपीला अटक करून १२ लाख ४५ हजार रुपये किमतीच्या १८ रिक्षा बुलढाणा येथून जप्त करण्यात यश आले आहे. मुख्य मंझे हा रिक्षा चालवत असतानाच चोरीच्या रिक्षा हेरून तो त्या चोरी करत होता.



पनवेल शहर परिसरातील व आजुबाजुच्या पोलीस ठाणे परिसरात दिवसेंदिवस रिक्षा चोरीच्या गुन्ह्यांच्या वाढत्या घटनांच्या अनुषंगाने वरिष्ठांनी दिलेल्या सुचनांप्रमाणे गुन्हे प्रकटीकरण पथकामार्फत तांत्रिक तपास, सीसीटीव्ही फुटेज तपास, गुप्त बातमीदार व इतर प्रकारे शोध चालू असताना पनवेल शहर पोलीस ठाण्याचे गुन्हे प्रकटीकरण पथकाचे पोहवा नितीन वाघमारे, पोहवा महेंद्र वायकर व पोशि चंद्रशेखर चौधरी हे पोलीस ठाणे हद्दीमध्ये गस्त करत असताना गुन्ह्याचे घटनास्थळावरील सीसीटीव्ही फुटेजमध्ये दिसणाऱ्या आरोपीशी साम्य असलेला संशयीत इसम दिसला. त्याला स्थानिक नागरीकांचे मदतीने ४ किलोमीटर पाठलाग करून ताब्यात घेवून विचारपूस केली.

या वेळी त्याने त्याचे नाव निसार सत्तार खान, (वय ३६, रा. कच्छी मोहल्ला, पनवेल) असल्याचे सांगितले. या इसमाकडे गुन्हयाचे अनुषंगाने विचारपुस केली असता त्याने पनवेल शहर पोलीस ठाणे दाखल असलेल्या गुन्ह्यातील ऑटो रिक्षा चोरी केल्याचे कबुल केले. आरोपीकडे कौशल्यपुर्ण अधिक तपास केला असता आरोपीने सदर गुन्हयातील तसेच पनवेल शहर, कळंबोली, कामोठे पोलीस ठाण्याच्या परीसरातुन देखील सुमारे एक वर्षापासून १८ ऑटो रिक्षा चोरी केल्याचे कबुल करून ऑटो रिक्षा या त्याने बुलढाणा जिल्ह्यातील मेहकर तालुका येथे विक्री केल्याचे सांगितल्याने.

या आरोपीला अटक करून त्याने दिलेल्या माहीतीची शहानिशा करण्याकरीता बुलढाणा पोलीस पथक रवाना करण्यात आले होते. पनवेल शहर पोलीस ठाण्याचे पोलीस पथकाने तालुका मेहकर जिल्हा बुलढाणा येथे जावुन स्थानिक पोलिसांचे मदतीने विविध गुन्हयातील तब्बत १८ ऑटो रिक्षा ताब्यात घेवून त्याचा अभिलेख तपासला असता मिळालेल्या रिक्षापैकी १० ऑटो रिक्षा या पनवेल शहर पोलीस ठाण्याकडील गुन्हयातील, चार ऑटो रिक्षा कळंबोली पोलीस ठाण्याकडील दाखल गुन्हयातील आणि ३ ऑटो रिक्षा या कामोठे पोलीस ठाणे कडील दाखल गुन्हयातील असल्याचे निष्पन्न झाले. एका ऑटो रिक्षावरील इंजिन नंबर व चेसिस नंबर खोडण्यात आल्याने या रिक्षाबाबत अद्यापपर्यंत उपयुक्त माहिती प्राप्त झालेली नाही. अशा प्रकारे नवी मुंबई आयुक्तालयातील सुमारे १२ लाख ४५ हजार रूपये किंमतीच्या १८ रिक्षा जप्त करण्यात आल्या असून १७ ऑटो रिक्षा चोरीचे गुन्हे उघडकीस आले आहेत.

## पारंपरिक समुद्र खाड्या प्रदुषित

◆ मच्छीमार चिंतेत; उपाययोजनेची मागणी

**उरण : प्रतिनिधी**

नवी मुंबई, ठाण्याची उपखाडीशी जोडणाऱ्या ३७ किमी परिसरातील समुद्र खाड्या औद्योगिक प्रदुषणामुळे प्रदुषित झाल्याचे मागील आठवड्यात तपासलेल्या पाण्याच्या नमुन्यांच्या अहवालानंतर पुन्हा एकदा सिद्ध झाले आहे. यामुळे मच्छीमारांवर चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे. वेळीच उपाययोजना करण्यात याव्यात, अशी मागणी महाराष्ट्र स्मॉल स्केल ट्रेडिशनल फिश वर्कर्स युनियनने केली आहे.



ठाणे, नवी मुंबईशी जोडणाऱ्या ३७ किलोमीटर परिसरातील बेलापूर, कोपरा, पनवेल, कासाडी, न्हावा- शेवा, घारापुरी, तळोजा, दिवाळे आदी समुद्र खाड्या व उपखाड्या पारंपरिक मासेमारी करणाऱ्या मच्छीमारांसाठी अत्यंत समृद्ध समजल्या जातात, मात्र औद्योगिक क्षेत्रातुन रसायनमिश्रित विषारीयुक्त सांडपाणी मोठ्या प्रमाणावर समुद्र खाड्यांमध्ये सोडून देण्यात येते. यामुळे समुद्र खाड्यांमध्ये मोठ्या प्रमाणावर प्रदुषण वाढले आहे. यामुळे ठाणे, नवी मुंबईशी जोडणाऱ्या ३७ किलोमीटर परिसरातील पारंपारिक मच्छीमारांवर उपासमारीचे संकट उभे राहिले आहे.

गंभीर बाब मच्छीमारांनी निदर्शनास आणून दिल्यानंतर मागील आठवड्यात या प्रदुषित समुद्र खाड्यांची मच्छीमार संस्था, मच्छीमार आणि महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाचे नवीमुंबई क्षेत्रीय विभागाचे अधिकारी विशाल मुंडे यांनी संयुक्तपणे पाहणी केली.

दिवाळे खाडी, न्हावा-शेवा व सोनारी पर्यंतच्या खाडीपर्यंत केलेल्या संयुक्त पाहणीत विविध प्रकारच्या घरगुती, औद्योगिक सांडपाण्यामुळे सागरी खाड्या प्रदुषित झाल्याचे आढळून आले आहे तसेच समुद्र खाड्यातील पाण्याचे नमुनेही तपासणीसाठी लॅबमध्ये पाठविण्यात आले आहेत.

दरम्यान, समुद्र खाड्यांची संयुक्त पाहणी केली आहे. समुद्र खाड्यांमध्ये दुषित पाणी आढळून आले आहे. पाण्याचे नमुनेही तपासणीसाठी शासकीय लॅबमध्ये पाठविण्यात आले आहेत.तसेच तळोजा औद्योगिक क्षेत्रातील पाण्याचे नमुने त्या विभागाकडे वर्ग करण्यात आले असल्याची माहिती महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाचे नवी मुंबई क्षेत्रीय विभागीय अधिकारी विशाल मुंडे यांनी दिली आहे.

## चिर्ले ते दिघोडे मार्ग दुरूस्तीची मागणी

**उरण : प्रतिनिधी**

उरण तालुक्यातील चिर्ले ते दिघोडे मार्गावर कंटेनर वाहतुकीमुळे मोठमोठे खड्डे पडले आहेत. या खड्ड्यांमुळे या मार्गावरून दररोज जीव मुठीत घेऊन प्रवास करावा लागत आहे. जेएनपीटी बंदरावर आधारित अनेक गोदामे चिर्ले, दिघोडे, वेश्वी, जांभूळपाडा, दादरपाडा या गावांमध्ये आहेत. त्यामुळे हा परिसर कंटेनरच्या गोदामांचे गाव म्हणून ओळखला जात आहे.

या मार्गावरून दिवसरात्र हजारो कंटेनर वाहने ये-जा करीत आहेत. हा मार्ग रानसई धरणासाठी एमआयडीसीकडून तयार करण्यात आला होता. त्यानंतर सध्या हा मार्ग सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अखत्यारीत आहे. हा दास्तान ते दिघोडे मार्ग होता.

यातील दास्तान ते चिर्ले मार्गावर नव्याने उड्डाणपूल उभारण्यात आला आहे. तर चिर्ले ते दिघोडे मार्गावरील वाढत्या वाहनांमुळे प्रचंड खड्डे पडले आहेत. हे खड्डे बुजविण्याची जबाबदारी सार्वजनिक बांधकाम विभागाची आहे.



## वाशी येथे संमेलन

**नवी मुंबई :** मराठी विज्ञान परिषद-नवी मुंबई विभाग आणि मराठी साहित्य संस्कृती व कला मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने एकदिवसीय संमेलन शनिवारी (दि.२२) साहित्य मंदिर, वाशी येथे होणार आहे.

अध्यक्षपद डॉ. जे.बी. जोशी कुलपती, आयसीटी-मुंबई आणि अध्यक्ष, मराठी विज्ञान परिषद) भूषवणार आहेत. या संमेलनात 'अन्न व औषध प्रशासन आणि सामाजिक बांधिलकी', उद्योजक बनू या', कृत्रिम बुद्धिमत्ता, मौखिक आरोग्य, 'सायबर गुन्हे आणि प्रतिबंध', 'उर्जाक्षेत्रातील भारतापुढील आव्हाने व संधी', ऊर्जेचा प्रश्न ते सौरऊर्जेचा पर्याय इत्यादी विषयांचा समावेश असून अन्न पदार्थातील भेसळ कशी ओळखावी याविषयीचे प्रात्यक्षिक तसेच शालेय विद्यार्थ्यांसाठी विज्ञान प्रयोग व प्रदर्शन आणि दंतचिकित्सा शिबिर आहे. या संमेलनाच्या अधिक माहितीकरिता https://mavipanavimumbai.org/ या लिंक पाहावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

## महावाचन उत्सवात रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूलची गार्गी महाडिक रायगडात प्रथम

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

महावाचन उत्सव उपक्रमांतर्गत झालेल्या स्पर्धेत जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खारघर येथील रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूलमधील इयत्ता चौथीतील गार्गी महाडीक हिने उत्कृष्ट वाचन कौशल्याचे प्रदर्शन करत प्राथमिक गटातून रायगड जिल्ह्यात प्रथम क्रमांक पटकावला.



सन २०२४-२०२५ या शैक्षणिक वर्षात राज्यातील सर्व माध्यमांच्या व व्यवस्थापनांच्या शाळांमध्ये 'महावाचन उत्सव २०२४' हा उपक्रम राबवण्यात आला. हा उपक्रम तीन गटात राबविण्यात आला. महावाचन उत्सव उपक्रम अंतर्गत आयोजित केलेल्या गट अ इयत्ता तिसरी ते पाचवी गटातील स्पर्धेत गार्गी महाडीक हिने रायगड जिल्ह्यातून प्रथम क्रमांक पटकावला. या स्पर्धेत प्रथम आलेल्या गार्गी महाडीक हिला जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या वतीने गौरविण्यात आले. या अभूतपूर्व यशाने गार्गीने सगळ्यांची मने जिंकली आहेत.

तिच्या या यशाबद्दल शाळेचे शिक्षक, पालक आणि विद्यार्थी वर्गाकडून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूलच्या मुख्याध्यापिका राज अलोनी आणि शिक्षकवृंद यांनी गार्गीच्या या यशाबद्दल आनंद व्यक्त करत तिला पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.



**नवी मुंबई : नेरूळ परिसरात वाढत असलेले अवैध फेरीवाले, विनापरवाना हातगाडी आणि अतिक्रमण यांच्यावर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी नागरिक महापालिकेकडे करीत आहेत.**



**पनवेल : दिगंबर जैन समाज, उलवेच्या वतीने वेदी प्रतिष्ठा समारंभाचे आयोजन २३ फेब्रुवारी रोजी करण्यात आले आहे. या सोहळ्याचे निमंत्रण आयोजकांनी आमदार प्रशांत ठाकूर यांना दिले. या वेळी भाजप जिल्हा चिटणीस ब्रिजेश पटेल उपस्थित होते.**

## वाशीत भास्करराव संगीत स्मृती समारोह

**नवी मुंबई :** प्रख्यात गायक, पं. डॉ. प्रकाश संगीत यांच्यातर्फे रविवार दि १६ फेब्रुवारी रोजी, नवी मुंबई, वाशी येथील गांधर्व निकेतनच्या सभागृहात कै. भास्करराव स्मृती समारोहाचे आयोजन करण्यात आले आहे.

या उपक्रमाचे हे १९ वे वर्ष आहे. या सभेत, डॉ.चैतन्य संगीत यांचे गायन, पं. प्रदीप बारोट यांचे सरोद वादन आणि पं. डॉ. प्रकाश संगीत यांचे गायन होईल. तबला साथ रामदास म्हात्रे, अच्युत तिजारे यांची प्रकाश चिटणीस यांची संवादिनी संगत असेल. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कांचन प्रकाश संगीत करतील. कार्यक्रम सर्वांसाठी खुला आहे.

## न्हावे विद्यालयात एसएससी शुभचिंतन सोहळा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेच्या न्हावे येथील न्यू इंग्लिश स्कूलमध्ये इयत्ता दहावी अर्थात एसएससी बोर्ड परीक्षा २०२५ला प्रविष्ट झालेल्या विद्यार्थ्यांसाठी शुभचिंतन सोहळा अत्यंत उत्साहात झाला.



विद्यालयाच्या स्थानिक शाळा समितीचे चेअरमन चंद्रकांत भोईर यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या समारंभास रयत शिक्षण संस्थेच्या रायगड विभागाचे सहायक विभागीय अधिकारी विलास जगताप प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. या शुभचिंतन सोहळ्यास चंद्रकांत भोईर (चेअरमन, न्यू इंग्लिश स्कूल, न्हावे), किसन पाटील, हरिश्चंद्र म्हात्रे, न्हावे सरपंच विजेंद्र पाटील, उपसरपंच शैलेश पाटील, विलास जगताप (विभागीय अधिकारी, रयत शिक्षण संस्था रायगड, कामोठे पनवेल) ज्येष्ठ पत्रकार माधव पाटील, सागर ठाकूर, सी.एल.ठाकूर, मिनाक्षी पाटील, चंद्रकांत पाटील, महेंद्र पाटील, रंजना पाटील, सुनिता भोईर, जागृती म्हात्रे, रामचंद्र म्हात्रे, नरेश मोकल, रयत को-ऑपरेटिव बँकेचे संचालक किशोर पाटील, संजय ठाकूर, नुरा शेख, 'रयत'चे जनरल बॉडी सदस्य रवींद्र भोईर, डि.के. म्हात्रे, कमळाबाई म्हात्रे, रंजना घरत, सुशीला पाटील, पी.ए. कोळी, (मुख्याध्यापक, न्यू इंग्लिश स्कूल, न्हावे), के. जे. ठोंबरे, पी.एम. ठाकूर आदी उपस्थित होते.

या शुभचिंतन समारंभाचे प्रास्ताविक विद्यालयाचे मुख्याध्यापक व रयत शिक्षण संस्थेचे लाईफ मेंबर प्रमोद कोळी यांनी केले तर सूत्रसंचालन गव्हाण विद्यालयाचे उपशिक्षक सागरकुमार रंधवे यांनी केले.

## 'मिस नवी मुंबई'साठी १३ सौंदर्यवती सज्ज

**नवी मुंबई : बातमीदार**

मिस नवी मुंबई सौंदर्य स्पर्धेच्या चौदाव्या पर्वाची सविस्तर माहिती देण्याकरिता पत्रकार परिषद सोमवारी आयोजित करण्यात आली, ज्यामध्ये तेरा सौंदर्यवतींची अधिकृत घोषणा करण्यात आली. फोर पॉईंट्स बाय शेरटन, वाशी येथे ८ मार्च २०२५ रोजी होणाऱ्या अंतिम सामन्यात हा प्रतिष्ठित किताब जिंकण्यासाठी त्या सज्ज झाल्या आहेत. स्पर्धेचे आयोजन यू अँड आय एंटरटेनमेंटद्वारे केले जाते आणि यंदाच्या सर्व तेरा सौंदर्यवती आपले सौंदर्य, प्रतिभा आणि आत्मविश्वासाच्या जोरावर या स्पर्धेत भाग घेत आहेत.

शेकडोच्या वर प्राथमिक फेरीत सहभाग झालेल्या स्पर्धकांपैकी पुढील तेरा स्पर्धक अंतिम फेरीत पोहोचल्या आहे. त्या पुढील प्रमाणे आहेत अदिती तांबे, अवनी आचार्य, भावना सिंग, काजल पवार, करिश्मा कदम, काव्या बाली, निशिता ताहिलरामानी, रुपवर्धिनी सस्ते, साक्षी चुरी, सारा इम्तियाज, शुभ्रिधी पटेरिया, विनीत कौर आणि वृषाली भगत. या प्रतिभावान स्पर्धक पारंपरिक वेशभूषा, वेस्टर्न वेअर आणि ईव्हनिंग गाऊन राऊंडमध्ये आपली चमक दाखवतील आणि मिस नवी मुंबई २०२५ चे विजेतेपद मिळवण्यासाठी प्रयत्नशील असतील.

हॉटेल फोर पॉइंट्स बाय शेरेटन या सौंदर्य स्पर्धेचे मुख्य प्रायोजक असून हॉटेल फोर पॉइंट्स बाय शेरेटन गेल्या आठ वर्षांपासून या स्पर्धेशी जोडले आहे, यंदाही अधिकृत स्थळ प्रायोजक म्हणून सहकार्य करत आहे. हॉटेल मॅनेजर किरण मुनिराज यांनी या सहकार्याबद्दल आनंद व्यक्त करत सांगितले. यंदाच्या स्पर्धेला फ्रेंच एसेंस हा प्रीमियम परफ्युम ब्रँड 'पावर्ड बाय' म्हणून सहकार्य करत आहे.

या भव्य सौंदर्य स्पर्धेचे आयोजक यू अँड आय एंटरटेनमेंट चे संचालक हरमीत सिंह आणि मनमीत सिंह यांनी यंदाच्या स्पर्धेबद्दल उत्साह व्यक्त करत सांगितले. ८ मार्च २०२५ रोजी होणारा ग्रँड फिनाले हा एक भव्य सोहळा असेल, जिथे स्पर्धक पारंपरिक वेशभूषा, वेस्टर्न वेअर आणि ईव्हनिंग गाऊन राऊंडमध्ये आपली चमक दाखवतील आणि नवी मुंबईच्या संस्कृतीचा उत्सव साजरा करतील. या पत्रकार परिषदेस व्हीएसएन फिल्म प्रोडक्शन्सचे निर्माता संदीप नागराले विशेष अतिथी म्हणून उपस्थित होते.



क्लिक...क्लिक...!

(छाया : सुधीर नाझरे)



**मुरूड : काशीद समुद्रकिनारी पर्यटक शुभ्र वाळू व लाटांमध्ये आनंद लुटत असतात.**

## पनवेलमध्ये दासनवमी उत्सव



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल येथील श्री रामदास (मारुती) मंदिरात १०८व्या दासनवमी उत्सवाला प्रारंभ झाला. या उत्सवाच्या दुसऱ्या सत्रामधे रत्नागिरी येथील हेमंत देशमुख यांचे गायन झाले.

चंदनाचे परिमल, कोटी कोटी रुपे तुझी, स्वकर शपथ, वाजे वृंदावनी वेणू असे अभंग, भक्तिगीते व नाट्यगीते त्यानी सादर केली. नंतर 'श्रीरंगा कमलाकांता' हे नाट्यपद गावून 'रघुकुलक दीपक आले' या भैरवीने कार्यक्रमाची सांगता केली.

# उच्चदाब विद्युतवाहिन्या टाकण्यास शेतकऱ्यांचा विरोध

## ◆ भाजप नेते वैकुंठ पाटील यांनी घेतली प्रांताधिकाऱ्यांसोबत बैठक

**पेण : प्रतिनिधी**

पेण तालुक्यातील खारकोलेटी येथील जमिनीमध्ये महापारेषणच्या वतीने उच्चदाब विद्युत वाहिन्या टाकण्यात येत असून या वाहिन्या शेतकऱ्यांना विश्वासात न घेता टाकण्यात येत असून या कामाला स्थानिक शेतकऱ्याचा विरोध आहे. या संदर्भात भाजप जिल्हा उपाध्यक्ष वैकुंठ पाटील यांच्या नेतृत्वाखाली जनशक्ती संघर्ष समितीच्या वतीने प्रांताधिकारी प्रवीण पवार यांना निवेदन देण्यात आले.



या बैठकीस संघर्ष समितीचे अध्यक्ष प्रभाकर डाकी, उपाध्यक्ष हेमंत भोईर, सचिव मधुकर ठाकूर, चंद्रकांत ठाकूर, तुलसा भोईर, दयाराम भोईर, किशोर भोईर, चंद्रकांत भोईर, प्रकाश भोईर, किशोर ठाकूर, जनार्दन भोईर, सुरेश तांडेल, कामिनी भोय, प्रमोद भोईर आदींसह शेतकरी उपस्थित होते.

या वेळी बोलताना वैकुंठ पाटील यांनी सांगितले की, रानसई ते वडखळ टाकण्यात येणाऱ्या उच्चदाब विद्युत वाहिनीच्या टॉवरचे काम चालू असून या कामाला शेतकऱ्यांनी विरोध दर्शविला असून यामुळे शेतकऱ्यांचे अपरिमित नुकसान होणार आहे. टॉवरलाईन टाकायला विरोध नसून नदीच्या बाजूने ही लाईन टाकण्यात यावी यामुळे महापारेषण विभागाने हे काम तातडीने बंद करून प्रथम शेतकऱ्यांना विश्वासात घ्यावे. याबाबतीत प्रताधिकाऱ्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना बोलावून बैठक लावण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली असल्याचेही त्यांनी सांगितले.

आमचा टॉवर लाईनला विरोध असून यामुळे शेतकऱ्याच्या शेतीचे नुकसान होणार असून भविष्यात जमिनीचे मूल्यांकन कमी होणार आहे, असे यावेळी संघर्ष समितीचे अध्यक्ष प्रभाकर डाकी यांनी सांगितले. प्रांताधिकारी प्रवीण पवार यांनी या कामाविषयी चौकशी करून संबंधित अधिकाऱ्यांना बोलावून बैठक लावण्यात येईल, असे त्यांनी सांगितले.

## ब्रेक फेल ट्रकमधून चालकाने मारली उडी

### चाकाखाली चिरडून मृत्यू

**खालापूर : प्रतिनिधी**

मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावर बोरघाटातील दत्त मंदिराजवळ एका ट्रकचा ब्रेक फेल झाल्याने चालकाने चालू गाडीतून क्लीनर बाजूने उडी मारली, मात्र तो ट्रकच्या मागील चाकाखाली येऊन चिरडला गेल्याने जागीच ठार झाला.

ट्रक क्रमांक एनएल ०१-एबी ८०९६चा चालक (नाव, गाव माहित नाही) पुणे ते मुंबई अशा दिशेने जात असताना शनिवारी (दि.१५) पहाटे ५च्या सुमारास हा अपघात झाला. ब्रेक फेल झालेला ट्रक हा पुढे जात येथील पहिल्या लेनच्या डिव्हायडरमध्ये घुसून अपघात झाला.



## रोह्याच्या सार्थक सोनकरची जेईई मुख्य परीक्षेत चमक

**नागोठणे : बातमीदार**

संपूर्ण देशभरात नुकतीच पार पडलेली व अत्यंत कठीण असलेली जेईई (जॉईंट एंट्रँस एक्झाम) म्हणजेच अखिल भारतीय आभियांत्रिकी प्रवेश परीक्षेसाठी देशभरातून सुमारे १७ लाखाहून अधिक विद्यार्थी बसले होते. यामध्ये माणगाव तालुक्यातील आमडोशी या छोट्याशा खेडेगावातील तसेच सध्या रोहा येथे राहत असणाऱ्या सार्थक विशाल सोनकर या विद्यार्थ्यांने ९४.४२ टक्के गुण मिळवून चमकदार कामगिरी केली आहे.



सार्थक याचे वडील विशाल सोनकर व आई वेदिका सोनकर हे दोघेही पेशाने शिक्षक आहेत. त्यांचे त्याला वेळोवेळी मार्गदर्शन मिळालेच, परंतु स्वतः सार्थक याची अभ्यासाविषयीची प्रचंड मेहनत, जिद्द, चिकाटी, अभ्यासू वृत्ती, अथक परिश्रम या बळावरच तो अत्यंत काठीण्यपातळी असलेल्या जेईई या परीक्षेत पास झाला आहे.

नातेवाईक कुटुंबीय, मित्रपरिवार तसेच विविध स्तरावरून सार्थकवर अभिनंदनाचा वर्षाव होत असून अनेकजण पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी शुभेच्छा देत आहेत.

## मदरसा आधुनिकीकरण योजना प्रस्तावास मुदतवाढ

**रायगड : रामप्रहर वृत्त**

रायगड जिल्ह्यातील मदरसांच्या आधुनिकीकरणासाठी डॉ. झाकीर हुसेन मदरसा आधुनिकीकरण योजना सन २०२४-२५साठी प्रस्ताव सादर करण्यास मुदतवाढ देण्यात आहे.

जिल्ह्यातील इच्छूक शाळांनी सन २०२४-२५ या आर्थिक वर्षाकरिता विहित नमुन्यातील अर्जासह प्रस्ताव जिल्हा नियोजन समिती, जिल्हाधिकारी कार्यालय, रायगड-अलिबाग यांच्याकडे २२ फेब्रुवारीपर्यंत सादर करावेत, असे आवाहन जिल्हा नियोजन अधिकारी तथा सदस्य सचिव, उच्चस्तरीय निवड समिती रायगड-अलिबाग जयसिंग मेहेत्रे यांनी केले आहे.

## पत्रकार संरक्षण कायद्यासाठी प्रयत्न करणार -खासदार तटकरे

**मुरूड : प्रतिनिधी**

रायगड प्रेस क्लबच्या पाठपुराव्यामुळे जिल्ह्यातील विविध प्रश्न मार्गी लागले असून पत्रकारांच्या समस्यांबाबत लोकप्रतिनिधी जागरूक आहेत. केंद्र स्तरावर पत्रकार संरक्षण कायदा पारित होण्यासाठी आपण पाठपुरावा करणार असल्याचे खासदार सुनील तटकरे यांनी रायगड प्रेस क्लबच्या २०व्या वर्धापन दिन व पुरस्कार वितरण सोहळ्यात खोपोली येथे केले.



महाराजा मंगल कार्यालयात झालेल्या या पुरस्कार वितरण सोहळ्यात मुरूड तालुका पत्रकार संघाचे सहसचिव गणेश चोडणेकर यांना रायगड जिल्हा श्रमिक पत्रकारिता पुरस्कार शाल, श्रीफळ व सन्मानचिन्ह व सन्मानपत्र देऊन प्रदान करण्यात आले

या कार्यक्रमास महाराष्ट्र मराठी पत्रकार परिषद अध्यक्ष मिलिंद अष्टीवकर, दै. सागरचे प्रशांत जोशी, मराठी पत्रकार परिषद तथा संस्थापक रायगड प्रेस क्लब एस.एम. देशमुख, जिल्हा अध्यक्ष मनोज खांबे, माजी बंदर निरीक्षक बाळकृष्ण कासार, जयंता कासार, मराठी परिषदेचे कोकण सचिव अनिल भोळे, कार्याध्यक्ष प्रशांत गोपाळे, उपाध्यक्ष मोहन जाधव, माजी अध्यक्ष भारत रांजणकर, अभय आपटे, विशाल परदेशी, मुरूड तालुका पत्रकार संघाचे अध्यक्ष सिराज शेख, मेघराज जाधव, सुधीर नाझरे, संजय करडे, अमोल जैन आदींसह तालुक्यातील पत्रकार उपस्थित होते.

खासदार सुनील तटकरे पुढे म्हणाले की, पत्रकारांनी रोखठोक समस्या आपल्या वृत्तपत्रातून मांडव्यात, जेणेकरून त्या समस्या लोकप्रतिनिधींपर्यंत पोहचतील. पत्रकार संरक्षण कायदा, पत्रकार आरोग्य विमा, अधिस्वीकृती, पेन्शन योजना अशा विविध प्रलंबित प्रश्न लवकरात लवकर मार्गी लावू.

## हजरत शाह शरफुद्दीन शाह बाबा दर्ग्याचा उरूस

**सुधागड : प्रतिनिधी**

सुधागड तालुक्यातील पाली येथे हजरत शाह शरफुद्दीन शाह बाबा (र.अ.) दर्ग्याचा उरूस शुक्रवारी (दि. १२) मोठ्या उत्साहाने साजरा सुरू झाला. हा उरूस तीन दिवस चालते.



उरूसनिमित्त मुस्लिम बांधवांनी ढोल-ताशांच्या निनादात सायंकाळी शहरात वाजतगाजत भव्य 'संदल' (मिरवणूक) काढली. खालच्या मोहल्यातून सुरू झालेल्या या मिरवणुकीत शेकडो मुस्लिम बांधव सहभागी झाले होते. पाली शहरातून फिरून मिरवणूक दर्ग्याजवळ येताच चादर चढविणे व आदी पारंपरिक कार्यक्रम पार पडले. संदल झाल्यानंतर उरूसनिमित्त नियाज (खाना) कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमात मुस्लिम बांधवांसह अन्य धर्मीय लोक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

उरूसनिमित्त दर्ग्याजवळ आकर्षक सजावट करण्यात आली असून मांडवही उभारण्यात आले होते. १४ फेब्रुवारी रोजी रात्री १० वाजता दर्ग्याजवळ कव्वालीचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. कव्वाल जुनेद सुलतानी यांनी आपल्या सुमधुर आवाजाने उपस्थितांचे मन जिंकले.

उरूस यशस्वीतेसाठी पाली मुस्लिम कमिटी अध्यक्ष सलाम पानसरे, उरूस समिती अध्यक्ष सुलतान बेनसेकर, उपाध्यक्ष अकिल महाडकर, कार्यकारी अध्यक्ष जावेद पठाण, खजिनदार अश्रफ पानसरे, पाली मुस्लिम कमिटी आणि उरूस समितीच्या वतीने पुढाकार घेण्यात आला आहे.

## खांदाड शाळेत खाऊगल्ली कार्यक्रम

**माणगाव : प्रतिनिधी**

रायगड जिल्हा परिषदेच्या माणगाव नगरपंचायत हद्दीतील खांदाड शाळेत नुकताच खाऊगल्ली कार्यक्रम उत्साहात झाला.





या कार्यक्रमाचे उद्घाटन जि.प.चे माजी शिक्षण व आरोग्य समिती सभापती ज्ञानदेव पवार यांच्या हस्ते फीत कापून करण्यात आले. या वेळी केंद्रप्रमुख शंकर शिंदे, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष महेश पवार, उपाध्यक्ष तेजस्वी घर्वे, पालकवर्ग व ग्रामस्थ उपस्थित होते. सर्वांचे स्वागत शाळेच्या मुख्याध्यापिका नंदिनी वाले, शिक्षिका मधुरा वेदपाठक यांनी स्वागत केले.

शाळेतील विद्यार्थ्यांना व्यावहारिक ज्ञान आत्मसात व्हावे हा उद्देश नजरेसमोर ठेवून शाळेतर्फे खाऊगल्ली कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात एकूण २१ विविध पदार्थांची दुकाने लावण्यात आली होती. त्यामध्ये गुलाबजाम, पावभाजी, भजी, कलिंगड, पॉपकोर्न, दाबेली, पॅटिस, पाणी व शेवपुरी, फळांचा ज्युस, लिंबू सरबत अशा विविध पदार्थांची दुकाने लावण्यात आली होती.

माजी सभापती ज्ञानदेव पवार, केंद्र प्रमुख शंकर शिंदे, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष, उपाध्यक्ष, पालक यांनी या पदार्थांचा आस्वाद घेऊन विद्यार्थ्यांचे कौतुक केले. पवार यांनी प्रोत्साहनपर प्रत्येकी १०० रुपये देऊन सर्व २१ दुकानधारक विद्यार्थ्यांचा आनंद द्विगुणित केला.

## माजी सैनिकांसाठी पोलादपूर येथे मेळावा

**रायगड : रामप्रहर वृत्त**

पोलादपूर तालुक्यातील माजी सैनिक, माजी सैनिक विधवा, युद्ध विधवा, वीरपत्नी, वीरमाता, वीरपिता यांच्याकरिता २१ फेब्रुवारी रोजी सकाळी १० वाजता पोलादपूर येथील कॅ. विनायक मोरे सभागृहात सैनिक मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे.

या मेळाव्यात जिल्हा सैनिक कल्याण कार्यालयाचा विविध आर्थिक मदती, माजी सैनिक महिला बचत गट स्थापन करणे, माजी सैनिकांना रोजगार विषयक माहिती तसेच जिल्हा उद्योग केंद्र, अलिबाग यांच्याकडून 'नाबार्ड'मार्फत राबविल्या जाणाऱ्या विविध योजनांची माहिती देण्यात येणार आहे तसेच कल्याणकारी निधीतून मिळणारी आर्थिक मदत यांची माहिती देण्याकरिता या मेळाव्यास जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी व कार्यालयीन कर्मचारी उपस्थित राहणार आहेत.

या मेळाव्यास जास्तीत जास्त संख्येने उपस्थित रहावे, असे आवाहन रायगड जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी ले. कर्नल राहुल वैजनाथ माने (नि.) यांनी केले आहे.

## मराठीला अभिजात भाषेचा दर्जा : काय बदल होणार?

अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन दिल्ली येथे २१, २२ व २३ फेब्रुवारी या तीन दिवसांत संपन्न होत आहे. हे ९८वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन आहे. मायमराठीला अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्यानंतरचे हे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन आहे. संमेलन यशस्वी करण्यासाठी अनेक हात मदत करत आहे. शासनही याला पाठबळ देत आहे. देशाचे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते या मराठी साहित्य संमेलनाचे उद्घाटन होणार आहे.

९८ वे
अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन, दिल्ली
२०२५

केंद्रीय मंत्रिमंडळाने मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा देण्याचा निर्णय घेतला आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला. मराठीबरोबरच पाली, प्राकृत, असामी, आणि बंगाली भाषेलाही अभिजात भाषेचा दर्जा मिळाला आहे. भारताची समृद्ध भाषिक परंपरा लक्षात घेता, विविध भाषांना त्यांचा ऐतिहासिक आणि सांस्कृतिक वारसा जपण्यासाठी प्रोत्साहन देणे गरजेचे आहे. या दृष्टीने, मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्याने तिच्या संवर्धनासाठी आणि विकासासाठी मोठी चालना मिळेल. या दर्जामुळे मराठी भाषेच्या अभ्यासकांना, संशोधकांना आणि साहित्यप्रेमींना अनेक संधी मिळतील.

अभिजात भाषेचा दर्जा म्हणजे काय?

भारत सरकारने काही विशिष्ट निकष पूर्ण करणाऱ्या भाषांना अभिजात भाषेचा दर्जा दिला आहे. यामध्ये खालील प्रमुख अटी पूर्ण करणाऱ्या भाषांचा समावेश होतो.

प्राचीन वारसा : संबंधित भाषेचा उगम आणि तिचा लिखित इतिहास किमान १५०० वर्षे जुना असावा. समृद्ध साहित्य परंपरा : भाषा केवळ बोलीभाषा नसून तिच्या साहित्य वारशाचा स्वतंत्र ठेवा असावा. मूळ लिपी आणि व्याकरण: भाषेची स्वतःची व्याकरणशास्त्र आणि लिपी असावी. संस्कृती आणि परंपरेशी नातं : भाषेचे साहित्य आणि परंपरा आधुनिक भारतीय भाषांवर मोठा प्रभाव टाकत असाव्यात.संस्कृत, तमिळ, तेलुगू, कन्नड, मलयाळम आणि ओडिया या भाषांना आधीच हा दर्जा प्राप्त झाला आहे. आता मराठीलाही हा बहुमान मिळाल्याने मोठे बदल घडणार आहेत.

मराठी भाषेला अभिजात दर्जा मिळाल्याने होणारे फायदे

**१) मराठीच्या बोलीभाषांचा आणि व्याकरणाचा सखोल अभ्यास**

मराठीत अनेक बोलीभाषा आहेत, जसे की कोकणी, अहिराणी, वऱ्हाडी, मालवणी इत्यादी. या बोलींचा अभ्यास, संशोधन आणि दस्तऐवजीकरण करण्यासाठी सरकारकडून विशेष प्रोत्साहन मिळेल.

**२) संशोधन आणि साहित्यवाढीला चालना**

अभिजात भाषेसाठी केंद्र सरकार संशोधन कार्यक्रमांना अधिक आर्थिक मदत देते. मराठी भाषेतील साहित्य, लेखन आणि ऐतिहासिक ग्रंथांचे संरक्षण करण्यासाठी विशेष योजना आखल्या जातील.

मराठीत प्राचीन हस्तलिखित ग्रंथांचे संकलन, संगणकीकरण आणि भाषांतर करण्यासाठी निधी दिला जाईल.

**३) शैक्षणिक संधी आणि विद्यापीठांमध्ये अधिक महत्त्व**

भारतातील सर्व ४५० विद्यापीठांमध्ये मराठी भाषा शिकवण्याची सुविधा निर्माण केली जाऊ शकते. मराठीतील संशोधनाला राष्ट्रीय स्तरावर अधिक महत्त्व मिळेल. मराठी अभ्यासक्रमांना नवीन संधी उपलब्ध होतील आणि विद्यापीठांना यासाठी विशेष अनुदान मिळेल.

**४) सरकारी अनुदान आणि मदत**

अभिजात भाषेच्या संवर्धनासाठी केंद्र सरकार दरवर्षी मोठ्या प्रमाणावर निधी देते. मराठी भाषेच्या जतनासाठी आणि प्रसारासाठी काम करणाऱ्या संस्था, संशोधक आणि साहित्यिकांना आर्थिक मदत मिळेल. मराठी संस्कृतीशी निगडित विविध उपक्रमांना अधिक प्रोत्साहन दिले जाईल.

**५) राष्ट्रीय पुरस्कार आणि गौरव**

अभिजात भाषेतील उत्कृष्ट संशोधनासाठी दरवर्षी दोन राष्ट्रीय पुरस्कार दिले जातात. यापुढे मराठीतील भाषातज्ज्ञ, साहित्यिक आणि संशोधक यांना हे पुरस्कार मिळू शकतील. मराठी भाषेच्या वृद्धीसाठी कार्य करणाऱ्या संस्थांना केंद्र सरकारकडून गौरव मिळेल.

**६) आंतरराष्ट्रीय स्तरावर ओळख आणि महत्त्व**

अभिजात भाषांचा दर्जा मिळालेल्या भाषा अधिक सन्माननीय मानल्या जातात. यामुळे जागतिक स्तरावर मराठी भाषा आणि तिच्या समृद्ध साहित्याला अधिक मान्यता मिळेल. मराठी भाषा आंतरराष्ट्रीय अभ्यासक्रमांमध्ये समाविष्ट होण्याची शक्यता वाढेल.

मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळणे ही मराठी भाषिकांसाठी मोठी उपलब्धी आहे. यामुळे भाषा टिकवण्यासाठी, तिच्या जतनासाठी आणि प्रसारासाठी मोठ्या प्रमाणावर प्रयत्न करता येतील. संशोधन, शैक्षणिक संधी, साहित्यवाढ आणि सरकारी मदतीमुळे मराठीचा विकास वेगाने होईल.

**संकलन : जिल्हा माहिती कार्यालय, रायगड-अलिबाग**

# जामनेरमध्ये आज कुस्तीचा महाकुंभ

## २००पेक्षा अधिक रथी-महारथी एकाच मंचावर



**जळगाव : प्रतिनिधी**

नऊ देशातील नामवंत आणि किर्तीवंत पैलवानांसह भारतातील तब्बल ४००पेक्षा अधिक रथी-महारथींमधे होणारी दंगल पाहण्यासाठी जळगावच्या जामनेरमध्ये रविवारी (दि. १६) पन्नास हजारांपेक्षा अधिक कुस्तीप्रेमींचा जनसागर उसळणार आहे. नमो कुस्ती महाकुंभानिमित्त आयोजित देवाभाऊ केसरी स्पर्धेत जागतिक किर्तीच्या खासबाग आखाड्याच्या धर्तीवर उभारण्यात आलेल्या मंचावर महाराष्ट्र केसरी पृथ्वीराज मोहोळविरुद्ध आशियाई पदक विजेता जलाल म्हजोयूब, शिवराज राक्षे जगजेता गुलहिर्मो लिमा यांच्याशी भिडण्यासाठी सज्ञ झाला आहे.

भव्य आणि दिव्य आयोजन जलसंपदामंत्री गिरीश महाजन यांच्या पुढाकाराने करण्यात आले आहे. भव्य स्पर्धेत भारतातील नामांकित महिला कुस्तीपटू परदेशी मल्लांविरुद्ध आपली ताकद आजमावणार आहेत. ट्रिपल महिला महाराष्ट्र केसरी भाग्यश्री कोळी ही एस्टोनियाच्या युरोपियन चॅम्पियन मार्टा पाजूलाशी भिडणार आहे तसेच विजय चौधरी (विश्व विजेता, ट्रिपल महाराष्ट्र केसरी) वि. सुक्सरोब जॉन (एशिया विजेता-उझबेकिस्तान), प्रतीक्षा बांगडी (पहिली महिला महाराष्ट्र केसरी) वि. अंजलीक गोन्झालेझ (वर्ल्ड चॅम्पियन-फ्रान्स), शिवराज राक्षे (डबल महाराष्ट्र केसरी) वि. गुलहिर्मो लिमा (वर्ल्ड चॅम्पियन), अमृता पुजारी (महिला महाराष्ट्र केसरी) वि. कॅटालिना क्सेन्टने (ऑलीम्पियन-रोमानिया), सिकंदर शेख (महाराष्ट्र केसरी) वि. घेओघे एरहाण (युरोप चॅम्पियन-मोल्दोवा), पृथ्वीराज मोहोळ (महाराष्ट्र केसरी) वि. जलाल म्हजोयूब (आशियाई पदकविजेता-इराण), हर्षवर्धन सदगीर (महाराष्ट्र केसरी) वि. पै. इमामुक (वर्ल्ड चॅम्पियन-जॉर्जिया), सुमित मलिक (अर्जुन पुरस्कार, ऑलिम्पियन) वि. पै.जस्सा (शेर-ए-पंजाब) , पृथ्वीराज पाटील (महाराष्ट्र केसरी) वि. पै. जॉन्टी गुज्ञर (आंतरराष्ट्रीय विजेता-दिल्ली), वेताळ शेळके (भवानी केसरी-महाराष्ट्र) वि. दिनेश गोलिया (आंतरराष्ट्रीय विजेता-हरियाणा), फ्लोरिन ट्रिपोन (युरोप चॅम्पियन-रोमानिया) वि. महेंद्र गायकवाड (उपमहाराष्ट्र केसरी), भूपिन्दर सिंह (भारत केसरी-पंजाब) वि. युधिष्ठिर दिल्ली (राष्ट्रीय विजेता-हरियाणा), कमलजित धूमछडी (रुस्तम-ए-हिंद-पंजाब) वि. विक्रांत कुमार (राष्ट्रीय विजेता-हरियाणा), सतेंदर मलिक (भारत केसरी-हरियाणा) वि. योगेश पवार (उपमहाराष्ट्र केसरी), बालाराफिक शेख (महाराष्ट्र केसरी) वि. सोनू (हिमाचल केसरी-हरियाणा), हरियाणा माउली जमदाडे (महान भारत केसरी) वि. मनजीत खत्री (भारत केसरी-हरियाणा), शिवा चव्हाण (राष्ट्रीय विजेता-महाराष्ट्र) वि. रजत मंडोथी (त्रिमूर्ती केसरी-हरियाणा), मुन्ना झुंजुर्के (महाराष्ट्र चॅम्पियन) वि. हरिओमी ट्रॅक्टर (राष्ट्रीय विजेता-दिल्ली), बाळू बोडके (महाराष्ट्र चॅम्पियन) वि. मनजीत मेला (राष्ट्रीय विजेता-हरियाणा), वेदांतिका पवार (उपमहाराष्ट्र केसरी) वि. शिवानी मेटकर (राष्ट्रीय विजेती), अपेक्षा पाटील (राष्ट्रीय विजेती) वि. सोनाली मंडलिक (राष्ट्रीय विजेती) या २२ प्रमुख लढतीसोबत स्थानिक ३०० महिला आणि पुरुष पैलवानांच्याही जोरदार कुस्त्या पहायला मिळणार आहे.

### महिला पैलवानांना मान

या कुस्ती आयोजनानिमित्त महिला कुस्तीलाही समान सन्मान दिला जाणार आहे. तब्बल ५० महिलांच्या कुस्त्या या मंचावर रंगणार असून स्पर्धेची सुरुवात आणि समारोप महिला कुस्तीनेच केला जाणार असल्याची माहिती आयोजकांनी दिली. कुस्तीच्या इतिहासात प्रथमच महिला कुस्तीला हा सन्मान मिळणार असल्यामुळे महिला कुस्तीपटूंमध्ये आनंदाचे वातावरण आहे.

### विजेत्यांवर बक्षिसांचा वर्षाव

*स्पर्धेत सहभागी खेळाडूंवर बक्षीसांचा अक्षरश: वर्षाव होणार असून विजेत्यांना रोख पारितोषिकांसह मानाची गदा आणि देवाभाऊ केसरी हा प्रतिष्ठेचा किताब प्रदान केला जाणार आहे, अशी माहिती संयोजक हिंदकेसरी रोहित पटेल यांनी दिली. विजेत्या खेळाडूंना तीन किलो वजनाची चांदीची गदा आणि मानाचा पट्टा ही बहाल केला जाणार असून अव्वल दंगलीतील पराभूत खेळाडूलाही रोख पुरस्कार दिले जाणार आहेत.*

# चॅम्पियन्स ट्रॉफीसाठी टीम इंडिया रवाना



**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

चॅम्पियन्स ट्रॉफी स्पर्धा १९ फेब्रुवारीपासून पाकिस्तानच्या यजमानपदाखाली सुरू होणार आहे, ज्यासाठी आठपैकी सात संघ पाकिस्तानला पोहचत आहेत, तर भारतीय संघ शनिवारी (दि. १५) दुबईला रवाना झाला आहे, जिथे तो या स्पर्धेत आपले सामने खेळेल.

टीम इंडिया मुंबई विमानतळावरुन दुबईला रवाना झाल्याचा व्हिडीओ व्हायरल झाला आहे, ज्यामध्ये विराट-रोहित आणि कोच गौतम गंभीर दिसत आहे. भारताने आपल्या संघ खूप आधी जाहीर केला होता. यामध्ये रवाना होण्यापूर्वी दोन बदल दिसून आले. या स्पर्धेत रोहित शर्मा भारतीय संघाच्या कर्णधारपदाची जबाबदारी सांभाळत आहे, ज्याच्या नेतृत्वाखाली टीम इंडियाने २०२४मध्ये टी-२० विश्वचषक जिंकला होता.

या महत्त्वाच्या स्पर्धेत टीम इंडियाला २० फेब्रुवारी रोजी बांगलादेश संघाविरुद्ध पहिला सामना खेळायचा आहे. तेथील परिस्थिती लक्षात घेऊन रोहित शर्माच्या नेतृत्वाखाली दुबईला रवाना झालेल्या भारतीय संघात कुलदीप यादव, रवींद्र जडेजा, वॉशिंग्टन सुंदर, अक्षर पटेल आणि वरुण चक्रवर्ती यांच्यासह पाच फिरकीपटूंचा समावेश करण्यात आला आहे.

जेव्हा चॅम्पियन्स ट्रॉफीसाठी टीम इंडियाचा संघ जाहीर झाला तेव्हा जसप्रीत बुमराहला त्यात स्थान मिळाले, परंतु तो पूर्णपणे तंदुरुस्त नसल्यामुळे तो स्पर्धेतून बाहेर पडला आणि त्याच्या जागी हर्षित राणाला संघात स्थान देण्यात आले आहे. याशिवाय, यशस्वी जैस्वालच्या जागी वरुण चक्रवर्तीला संघात स्थान देण्यात आले. या महत्त्वाच्या स्पर्धेपूर्वी भारतीय संघाने इंग्लंडविरुद्ध घरच्या मैदानावर तीन सामन्यांची एकदिवसीय मालिका खेळली, ज्यामध्ये त्यांनी तिन्ही सामने जिंकण्यात यश मिळवले आणि कर्णधार रोहित शर्मा आणि विराट कोहली दोघेही आपला फॉर्म परत मिळवण्यात यशस्वी झाले.

### २३ फेब्रुवारीला पाकविरुद्ध भिडणार

भारत आणि पाकिस्तानचे चाहते २३ फेब्रुवारी रोजी होणाऱ्या आयसीसी चॅम्पियन्स ट्रॉफीची आतुरतेने वाट पाहत आहेत. या दिवशी टीम इंडिया दुबईच्या मैदानावर ग्रुप ए मध्ये यजमान पाकिस्तानशी सामना करेल. टीम इंडियाचे सर्व सामने भारतीय वेळेनुसार दुपारी २.३० वाजता सुरू होतील.

# ‘आरसीबी’च्या पोरींनी घडवला नवा इतिहास!

## सर्वात मोठ्या धावसंख्येचे लक्ष्य गाठणारा पहिला संघ



**वडोदरा : वृत्तसंस्था**

वूमन्स प्रीमियर लीगला शुक्रवारपासून सुरूवात झाली आहे. पहिलाच सामना गतवर्षीचा चॅम्पियन रॉयल चॅलेंजर्स बंगळुरु वि. गुजरात जायंट्स यांच्यात होता. यंदाच्या वूमन्स प्रीमियर लीगचा पहिलाच सामना ऐतिहासिक ठरला. आरसीबीने पहिल्याच सामन्यात गुजरात संघाचा सहा विकेट्सने आणि नऊ धावा राखून विजय मिळवला. या विजयासह आरसीबी संघाने इतिहास घडवला आहे.

आरसीबीने नाणेफेक जिंकत प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. हा निर्णय योग्य असल्याचे आरसीबीने पहिल्या १० षटकांत सिद्ध केले, पण बेथ मुनी आणि अॅश्ले गार्डनर यांनी संघाला २०० अधिक धावांचा टप्पा गाठण्यात मदत केली. मुनीने ४२ चेंडूत आठ चौकारांसह ५६ धावा केल्या, तर गुजरात संघाची कर्णधार गार्डनरने ३७ चेंडूत आठ षटकार आणि तीन चौकारांसह ७९ धावांची वादळी खेळी केली. यासह गुजरातने पहिल्याच सामन्यात पाच विकेट्स गमावत २०१ धावांची खेळी केली. आरसीबीकडून रेणुका सिंगने दोन विकेट्स घेतल्या, तर कनिका अहुजा, जॉर्जिया वेयरहम आणि प्रेमा रावत यांनी प्रत्येकी एक विकेट घेतली.

२०२ धावांच्या मोठ्या लक्ष्याचा पाठलाग करताना अॅश्ले गार्डनरने सुरूवातीच्या षटकांमध्ये दोन्ही सलामीवीरांना बाद करत संघाला मोठा धक्के दिले, पण आरसीबी याने डगमगला नाही. उत्कृष्ट अष्टपैलू खेळाडू एलिस पेरीने ३४ चेंडूत दोन षटकार आणि सहा चौकारांसह ५७ धावांची शानदार खेळी केली, तर राघवी बिश्तने २५ धावा करत त्याला चांगली साथ दिली. सायली सातघरेने पेरीला आणि डिएंड्रा डोटिनने राघवीला बाद करत चांगली भागदारी तोडली.

यानंतर आलेल्या रिचा घोष आणि कनिका अहुजा यांनी गियर बदलत उत्कृष्ट कामगिरी करत ९३ धावांची धमाकेदारी खेळी करून अशक्य विजय संघाला मिळवून दिला. पहिल्याच सामन्याची सामनावीर ठरलेली रिचाने २७ चेंडूत चार षटकार आणि सात चौकारांसह ६४ धावांची जबरदस्त खेळी केली आणि विजयी षटकारासह संघाला ऐतिहासिक विजय मिळवून दिला.

गुजरात संघाला त्यांच्या खराब फिल्डींगचा मोठा फटका दिसला आहे. संघाने एलिसा पेरीला तीन वेळा झेलबाद करण्याची संधी गमावली, तर रिचा घोष पहिल्याच चेंडूवर सीमारेषेवर मोठा फटका खेळताना झेलबाज होणार होती, पण संघाने तो झेलही सोडला आणि रिचाने वादळी खेळी करत संघाच्या विजयात मोठी भूमिका बजावली.

वूमन्स प्रीमियर लीगच्या इतिहासात आरसीबीचा संघ सर्वात मोठ्या धावसंख्येचं लक्ष्य गाठणारा पहिला संघ ठरला आहे. आरसीबीने १० चेंडू शिल्लक ठेवत २०२ धावांचे विजयी लक्ष्य गाठले. यापूर्वी ही कामगिरी मुंबई इंडियन्सच्या नावे होती, ज्यांनी गतवर्षी गुजरातविरूद्धच १९१ धावांचे विजय लक्ष्य गाठले होते.

# श्रीलंका संघाचा ऑस्ट्रेलियावर दणदणीत विजय

**कोलंबो : वृत्तसंस्था**

आयसीसी चॅम्पियन्स ट्रॉफीपूर्वी ऑस्ट्रेलियाच्या संघाला वनडे मालिका पराभवाचा मोठा धक्का बसला आहे. श्रीलंकेविरूद्ध सुरू असलेल्या दोन सामन्यांच्या वनडे मालिकेतील दुसऱ्या सामन्यात श्रीलंकेने ऑस्ट्रेलियाचा दारूण पराभव केला. यासह श्रीलंकेने ऑस्ट्रेलियाचा वनडे मालिकेत २-० असा एकतर्फी पराभव करत मालिका जिंकली आहे.

स्टीव्ह स्मिथच्या नेतृत्वाखाली खेळत असलेल्या वनडे चॅम्पियन संघाला श्रीलंकेने पराभवाचे पाणी पाजले. दुसऱ्या सामन्यात श्रीलंकेने प्रथम फलंदाजी करत दिलेल्या २८२ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना ऑस्ट्रेलियाचा संघ २४.२ षटकांत अवघ्या १०७ धावा करत सर्वबाद झाला. ऑस्ट्रेलियाच्या एकाही खेळाडूला ३० धावांचा टप्पा गाठता आला नाही. संघाचा कर्णधार स्टीव्ह स्मिथने सर्वात मोठी २९ धावांची खेळी केली. यष्टीरक्षक जोस इंग्लिसने २२ धावा केल्या, तर ट्रॅव्हिस हेड १८ धावा करत बाद झाला. याशिवाय सर्व खेळाडू एकेरी धावांवर बाद झाले. श्रीलंकेकडून तीक्ष्णाने सर्वाधिक चार विकेट घेतल्या.

### एकतर्फी मालिका विजयाची नोंद



श्रीलंकेने दुसऱ्या वनडे सामन्याची नाणेफेक जिंकत प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला होता. खेळपट्टीकडून गोलंदाजांना मदत मिळत होती. याचा फटका श्रीलंका संघालाही सुरुवातीला बसला, पण श्रीलंकेने कुसल मेंडिसच्या शतकाच्या मदतीने २८१ धावांची खेळी केली. मेंडिसने ११५ चेंडूत ११ चौकारांसह १०१ धावा केल्या. कर्णधार चरिथ असलंकाने ७८ धावा केल्या, तर निशान मधुशंकाने ५१ धावांची खेळी केली. संघाने निर्धारित ५० षटकांत चार बाद २८१ धावा केल्या होत्या.

# साईराज बहुतुले राजस्थान संघात

**जयपूर : वृत्तसंस्था**

राजस्थान रॉयल्स संघाने आतापर्यंत फक्त एकदाच आयपीएलचे जेतेपद पटकावले आहे तेही पहिल्या हंगामात. आता या संघाने माजी भारतीय लेग स्पिनर साईराज बहुतुले यांची फिरकी गोलंदाजी प्रशिक्षक म्हणून नियुक्ती केली आहे.

राजस्थान रॉयल्सच्या प्रेस रिलीजमध्ये म्हटले आहे की, ५२ वर्षीय साईराज बहुतुले रॉयल्समध्ये परतले आहेत. ते २०१८-२१पर्यंत आमच्या संघाचा भाग राहिले आहेत. त्यांची कोचिंग कारकीर्द यशस्वी राहिली आहे, ज्यामध्ये मुंबई, बंगाल, केरळसारख्या संघांचे आणि भारतीय राष्ट्रीय पुरुष संघाचा कोच राहिले आहेत.

# तिरंगी मालिकेत न्यूझीलंड अजिंक्य

## अंतिम सामन्यात पाकिस्तानचा धुव्वा

**कराची : वृत्तसंस्था**

न्यूझीलंडने तिरंगी मालिकेच्या अंतिम सामन्यात पाकिस्तानचा पाच विकेट्सने पराभव करत जेतेपद पटकावले. किवी संघाने २८ चेंडू शिल्लक असताना हा सामना जिंकला. या विजयामुळे २०२५ च्या चॅम्पियन्स ट्रॉफीपूर्वी न्यूझीलंड संघाचे मनोबल वाढेल. संपूर्ण मालिकेत एकही सामना न गमावता न्यूझीलंडने ट्रॉफीवर कब्जा केला आहे.

कराचीच्या राष्ट्रीय स्टेडियमवर खेळल्या गेलेल्या या सामन्यात पाकिस्तान संघाने प्रथम फलंदाजी करताना २४२ धावा केल्या. चॅम्पियन्स ट्रॉफीच्या अगदी आधी दबावाने भरलेल्या सामन्यात पाकिस्तान संघाचा कोणताही खेळाडू अर्धशतकही झळकावू शकला नाही. कर्णधार मोहम्मद रिझवानव्यतिरिक्त सलमान आघाने पुन्हा एकदा पाकिस्तान संघाची लाज राखण्याचा प्रयत्न केला. रिझवान आणि सलमान यांनी अनुक्रमे ४६ आणि ४५ धावा केल्या. तैय्यब ताहिरनेही ३८ धावांचे योगदान देत पाकिस्तानला २४२ धावांपर्यंत पोहचवले.



पाकिस्तानच्या २४३ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना न्यूझीलंडची सुरुवात खराब झाली. विल यंग फक्त ३ धावा करून बाद झाला. त्याच्यानंतर डेव्हॉन कॉनवे आणि केन विल्यमसन यांनी ७१ धावांची महत्त्वाची भागीदारी करून संघाचा डाव सावरला. विल्यमसन ३४ धावांवर बाद झाला, तर कॉनवेही त्याच्या नंतर ४८ धावांवर बाद झाला. यानंतर डॅरिल मिशेल संघाची धुरा सांभाळली. त्याने मधल्या षटकांमध्ये ५७ धावा काढल्या. याशिवाय टॉम लॅथमने ५६ धावांची खेळी केली. या दोघांनी न्यूझीलंडला विजय मिळवून दिला.

### मिशेल-लॅथमची महत्त्वपूर्ण भागीदारी

*डॅरिल मिशेल आणि टॉम लॅथम या दोघांनीही अर्धशतके झळकावून न्यूझीलंडला अंतिम सामना जिंकण्यास मदत केली. त्यांनी ८७ धावांच्या भागीदारीने महत्त्वाची भूमिका बजावली. दुसरीकडे पाकिस्तान संघाबद्दल बोलायचे झाले, तर बाबर आझम एकदा अपयशी ठरला आणि २९ धावा करून बाद झाला. त्याचवेळी शाहीन आफ्रिदीच्या गोलंदाजीत तीक्ष्णतेचा अभाव होता, ज्याने नऊ षटकांत ४५ धावा देऊन फक्त एकच गडी बाद केला.*

# नऊ भाषेत घेता येणार चॅम्पियन्स ट्रॉफीच्या सामन्यांचा आनंद

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

सर्व क्रिकेटप्रेमी आयसीसी चॅम्पियन्स ट्रॉफी स्पर्धेची आतुरतेने वाट पाहत आहेत. मिनी वर्ल्ड कप म्हणून ओळखली जाणारी ही स्पर्धा या वेळी पाकिस्तानच्या यजमानपदाखाली खेळवली जात आहे. दरम्यान, आयसीसीने थेट प्रक्षेपणाची सर्व माहिती शेअर करून भारतीय चाहत्यांना एक मोठी भेट दिली.

या स्पर्धेत भारतीय संघ त्यांचे सामने दुबई आंतरराष्ट्रीय क्रिकेट स्टेडियममध्ये खेळेल. पहिला सामना १९ फेब्रुवारी रोजी खेळला जाईल, तर अंतिम सामना ९ मार्च रोजी होईल. यामध्ये सहभागी होणाऱ्या आठ संघांना प्रत्येकी चार संघांच्या दोन वेगवेगळ्या गटात विभागण्यात आले आहे. आयसीसीने जाहीर केलेल्या लाईव्ह टेलीकास्टच्या माहितीत भारतीय चाहत्यांना मोठी भेट देण्यात आली आहे. पहिल्यांदाच भारतीय चाहत्यांना नऊ वेगवेगळ्या भाषांमध्ये आंतरराष्ट्रीय सामन्यांचे थेट प्रक्षेपण पाहता येईल.

भारतात सामन्यांचे थेट प्रक्षेपण स्पोर्ट्स १८ आणि स्टार स्पोर्ट्स नेटवर्कवर केले जाईल. याशिवाय सामन्यांचे ऑनलाइन लाईव्ह स्ट्रीमिंग जिओ हॉटस्टार अॅपवर होईल, ज्यात चाहते इंग्रजी, हिंदी, मराठी, हरियाणवी, बंगाली, भोजपुरी, तमिळ, तेलगू व कन्नड या नऊ भाषांमध्ये समालोचनाचा आनंद घेऊ शकतील.

# क्रिकेटपटूंमधील वाढत्या दुखापतींसाठी व्यस्त वेळापत्रक जबाबदार

## कपिल देव यांचे मत

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

विश्वचषक विजेत्या संघाचे कर्णधार कपिल देव यांनी भारतीय क्रिकेटपटूंमधील वाढत्या दुखापतींसंदर्भात चिंता व्यक्त करत यासाठी व्यस्त कॅलेंडरला जबाबदार ठरवले आहे.

खेळाडू वर्षातील जवळपास दहा महिने खेळत असतात तसेच बंगळुरूमधील राष्ट्रीय क्रिकेट अकादमी आजकाल खेळाडूंसाठी रिहॅबिलिटेशनचे केंद्र बनले आहे. तेथे खेळाडू सरावापेक्षा रिकव्हरीतच अधिक वेळ घालवत आहेत. या मालिकेतील ताजे नाव म्हणजे, भारताचा वेगवान गोलंदाज जसप्रीत बुमराह. बुमराह पाठीच्या दुखापतीमुळे सिडनी येथील ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या पाचव्या कसोटीतून बाहेर पडला होता.

चॅम्पियन्स ट्रॉफीच्या प्राथमिक संघात समावेश होऊनही बुमराहला अंतिम संघातून वगळण्यात आले. दुखापतीमुळे मोहम्मद शमी १४ महिने बाहेर होता.



१९८३ विश्वचषक विजेत्या संघाचे कर्णधार कपिल देव दिल्ली येथे टाटा स्टील गोल्फ पुरस्कार वितरण समारंभाच्या कार्यक्रमात बोलत होते. या वेळी मला चिंता एवढीच आहे की, ते वर्षातील दहा महिने खेळत आहेत, असे ते म्हणाले.

या वेळी, चॅम्पियन्स ट्रॉफीमध्ये बुमराहची कमतरता जाणवेल? असे विचारले असता, कपिल यांनी खेळाडूंना दुखापतग्रस्त खेळाडूंवर अवलंबून राहण्याऐवजी एकमेकांना सहकार्य करण्यावर फोकस करण्याचा सल्ला दिला.

कपिल देव म्हणाले, अशा खेळाडूसंदर्भात कशासाठी बोलायचे, जो संघातच नाही. हा संघाचा खेळ आहे आणि संघाला जिंकायचे आहे. एखाद्या व्यक्तीला नाही. हे बॅडमिंटन, टेनिस अथवा गोल्फ नाही. हे चॅम्पियन्स ट्रॉफीमध्ये संघ म्हणून भाग घेत आहेत. जर आपण संघ म्हणून खेळलो तर नक्कीच जिंकू.

ते पुढे म्हणाले, आपले मुख्य खेळाडू दुखापतग्रस्त व्हावेत, असे आपल्याला कधीही वाटत नसते, मात्र तसे झाले तर आपण काहीही करू शकत नाही. भारतीय संघाला शुभेच्छा!

# शाहीन आफ्रिदीसह पाकिस्तानच्या तीन खेळाडूंना दंड

**इस्लामाबाद : वृत्तसंस्था**

पाकिस्तानमध्ये सुरू असलेल्या तिरंगी मालिकेत यजमान संघाला मोठा धक्का बसला आहे. आयसीसीने आचारसंहितेचे उल्लंघन केल्याबद्दल तीन पाकिस्तानी खेळाडूंवर कारवाई केली आहे. तिन्ही खेळाडूंना दंड ठोठावण्यासोबतच, आयसीसीने त्यांच्या खात्यात प्रत्येकी एक डिमेरिट पॉइंटदेखील जोडला आहे.

शाहीन शाह आफ्रिदीला त्याच्या सामन्याच्या शुल्काच्या २५ टक्के दंड ठोठावण्यात आला. ही घटना दक्षिण आफ्रिकेच्या डावाच्या २८व्या षटकात घडली, जेव्हा शाहीनने



जाणूनबुजून फलंदाज मॅथ्यू ब्रिट्झकेला एक धाव घेण्यापासून रोखले, ज्यामुळे शारीरिक संपर्क झाला आणि दोन्ही खेळाडूंमध्ये जोरदार वाद झाला.

दुसरीकडे, २९व्या षटकात टेम्बा बावुमा धावबाद झाल्यानंतर त्याच्याजवळ अनावश्यकपणे येऊन आनंद साजरा केल्याबद्दल सौद शकील आणि कामरान गुलाम यांना त्यांच्या सामन्याच्या फीच्या १० टक्के दंड ठोठावण्यात आला.

दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. –मुख्य संपादक

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com